www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनधिी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 214 वा शनिवार दि. 19 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## खिशातून जबरदस्तीने पैसे घेऊन दगडाने केली मारहाण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

तीस वर्षीय तरुणाच्या खिशातील पैसे जबरदस्तीने काढून घेऊन दगडाने आणि लाथाबुक्याने मारहाण केल्याप्रकरणी तिघा जणां विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तसौर अन्सारी हा तक्का कॉलनी येथे राहत असून समाधान जनरल स्टोअर येथून पाण्याची बाटली घेऊन परत येत होता. त्यावेळी पाठीमागून आलेल्या अनोळखी इसमाने त्याच्या खिशातून बाराशे रुपये काढून घेतले. यावेळी अक्षय चव्हाण त्याला दिसून आला. पैसे का काढले असता असे विचारले असता त्याने धक्का दिला. त्यावेळी विकी याने शिवीगाळ केली आणि हाताने मारण्यास सुरुवात केली. त्यानंतर दादू याने अन्सारी याला पकडून ठेवले आणि तिघांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली आणि विकीने दगड उचलून डोक्यात मारला. यात अन्सारी हा जखमी झाला.

=========

## जनरेटरचे भाडे न देता केला अपहार, दोघांविरोधात गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**


भाड्याने दिलेल्या जनरेटरचे भाडे न देता अपहार केल्याप्रकरणी अजित शिंदे आणि संतोष भिलारे यांच्या विरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जयकुमार शेंडगे हे कळंबोली येथे राहत असून त्यांचा ट्रान्सपोर्टचा व्यवसाय आहे. ऑक्टोबर 2022 मध्ये अजित लक्ष्मण शिंदे आणि संतोष भिलारे यांनी त्यांना भाड्याने जनरेटरचे आवश्यकता असल्याचे सांगितले. यावेळी जनरेटरचे भाडे देणार असल्याचे सांगून महिना सात हजार रुपये भाडे देण्याचे ठरले. त्यानंतर ते जनरेटर घेऊन गेले. त्यांनी एप्रिल 2025 पर्यंत जनरेटरचे भाडे दिले नाही आणि जनरेटर देखील बऱ्याच वेळा मागणी करूनही दिलेला नाही. त्यामुळे त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

**दोन ट्रकच्या मध्ये अडकल्याने झाला मृत्यू**

नवीन पनवेल : दोन ट्रकच्या मध्ये अडकल्याने हनुमंत बाबा राजगे (४१, रा. हनुमान मंदिराच्या जवळ कळंबोली) यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली. ट्रक क्रमांक एम एच 11 एल 4711 वरील चालक हनुमंत राजगे यांनी त्यांचा ट्रक दुरुस्तीसाठी गॅरेजवर नेला होता. ट्रकचे काम पूर्ण झाले होते. काम व्यवस्थित झाले आहे का हे तपासण्यासाठी त्यांनी गाडीच्या खाली उभे राहून ट्रकची चावी फिरवल्याने ट्रक गिअर मध्ये असल्याने पुढे गेला आणि ते त्यांची ट्रक आणि बाजूला उभा असलेला ट्रक याच्यामध्ये अडकले. यात त्यांच्या छातीला गंभीर जखमा होऊन त्यात त्यांचा मृत्यू झाला.

# लाडकी बहीण योजना: एप्रिलचा हप्ता कधी मिळेल? ५०० मिळणार की १५००? जाणून घ्या

निराज्यातील महायुती सरकारने गेल्या २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेची प्रचंड चर्चाही झाली. विरोधक सातत्याने या योजनेवर टीका करत आहेत. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीने पुन्हा सरकार स्थापन झाल्यास लाडकी बहीण योजनेत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले. परंतु, याची पूर्तता कधी होईल, याची निश्चित शाश्वती नसल्याचे म्हटले जात आहे. यातच आता लाडकी बहीण योजनेतील काही लाभार्थी महिलांना केवळ ५०० रुपये मिळणार असल्याचा दावा विरोधकांकडून केला जात आहे. याबाबत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप प्रत्यारोप सुरू आहेत. यातच लाडकी बहीण योजनेतील एप्रिल महिन्याचा हप्ता कधी मिळणार, याकडे राज्यभरातील पात्र लाभार्थी महिलांचे लक्ष लागून राहिले आहे. काही दिवसांपूर्वी राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेतील पात्र लाभार्थी महिलांना मिळणाऱ्या निधीबाबत एक्सवर




पोस्ट करून माहिती दिली होती. दिनांक २८ जून २०२४ व दिनांक ३ जुलै २०२४ रोजी जाहीर करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार इतर कोणत्याही शासकीय योजनांचा लाभ न घेणाऱ्या महिलांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत १५०० रुपये दरमहा सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे. तसेच, इतर शासकीय योजनांचा १५०० रुपयांपेक्षा कमी लाभ घेणाऱ्या महिलांना उर्वरित फरकाची रक्कम सन्मान निधी म्हणून वितरित करण्यात येत आहे. त्याच शासन निर्णयाला अनुसरून नमो शेतकरी सन्मान योजनेचा दरमहा १००० रुपये लाभ घेत असलेल्या ७७४१४८ महिलांना उर्वरित फरकाचे ५०० रुपये सन्मान निधी वितरित करण्यात येत आहे, असे अदिती तटकरे यांनी म्हटले होते.

**लाडकी बहीण योजनेतील एप्रिलचा हप्ता कधी मिळेल?**

लाडकी बहीण योजनेतील नियम किंवा निकष बदलण्यात आलेले नाहीत. मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील लाडक्या बहिणींना **पान २ वर**

## पनवेलच्या स्वस्तिका घोषला महाराष्ट्रातील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठित अशा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराने टेबल टेनिसपटू स्वस्तिका घोष हिला सन्मानित करण्यात आले. बालेवाडी येथे राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत आज झालेल्या सोहळ्यात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते स्वस्तिकाला पुरस्कार प्रदान करण्यात आला. स्वस्तिकाला मिळणारा पुरस्कार पनवेलकरांसाठी अभिमानाची बाब ठरली असून तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे. पुण्यातील बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत झालेल्या या समारंभास प्रमुख मान्यवर म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे, पणन व राज शिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, आमदार उमा खापरे, आमदार अमित



बोरखे, अप्पर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर, क्रीडा आयुक्त हिरालाल सोनावणे आदींची उपस्थिती होती. आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये ती दररोज सहा तास **पान २ वर**

## खारघर शिवसेना उपशहरप्रमुखपदी हेमंत ब्रिजेश सिंह यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**



हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने व शिवसेना मुख्य नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी खारघर उपशहरप्रमुखपदी हेमंत ब्रिजेश सिंह यांची नियुक्ती करून त्यांना नियुक्तीपत्र खा.श्रीरंग बारणे यांच्या हस्ते देण्यात आले आहे.

हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण यांचा सक्रीयपणे प्रचार आणि प्रसार कराल, तसेच शिवसेना पक्षवाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेवून कार्य कराल असा विश्वास यावेळी खा.श्रीरंग बारणे यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीवेळी जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, तालुकाप्रमुख रुपेश ठोंबरे व खारघर शहरप्रमुख प्रसाद सावंत आदींसह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## भाजपा कोकण विभागीय कोअर कमिटीच्या बैठका संपन्न



**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र प्रदेश भाजपच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या 'संघटन पर्व' अभियानांतर्गत मंडल अध्यक्ष निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने कोकण विभागातील जिल्हा कोअर समिती सदस्यांच्या स्वतंत्र बैठका आज राष्ट्रीय महासचिव अरुण सिंह आणि प्रदेश कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबईतील भाजप प्रदेश कार्यालयात संपन्न झाल्या. यामध्ये रायगड दक्षिण, रायगड उत्तर, रत्नागिरी उत्तर, रत्नागिरी दक्षिण, सिंधुदुर्ग, भिवंडी, ठाणे शहर, उल्हासनगर या विभागांचा समावेश होता.या बैठकीच्या अनुषंगाने आगामी दोन दिवसात भाजपच्या मंडल अध्यक्ष निवड जाहीर करण्यात येणार आहे.

आजच्या विविध बैठकांदरम्यान मंत्री नितेश राणे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार निरंजन डावखरे, आमदार सुलभाताई गायकवाड, आमदार विक्रांत पाटील, माजी आमदार विनय नातू, प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, प्रदेश कार्यकारिणी सदस्य मनोहर केमचंदानी, प्रदेश महामंत्री माधवीताई नाईक, प्रदेश महामंत्री राजेश पांडे, मुख्यालय प्रभारी रवि अनासपुरे, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, चारुशीला घरत, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा अश्विनी पाटील, उत्तर रत्नागिरी जिल्हाध्यक्ष केदार साठे, दक्षिण रत्नागिरी जिल्हाध्यक्ष राजेश सावंत, सिंधुदुर्ग जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत, ठाणे शहर जिल्हाध्यक्ष संजय वाघुले, उल्हासनगर जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी आदी मान्यवर उपस्थित होते.

## उरण टपाल कार्यालयासाठी जागेचा शोध.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

उरण येथे टपाल कार्यालय सुरू होण्यासाठी संबंधित विभाग जागेचा शोध करत आहे. या विभागांनी आवश्यक बाबीची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरू केली आहे.यामध्ये प्रथम कार्यालयासाठी भाडेतत्त्वावर जागेचा शोध सुरू आहे. टपाल कार्यालयासाठी जागा देणाऱ्या इच्छुक जागामालकांकडून प्रस्ताव मागितले आहेत. उरण मधील वाढते औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या नुसार उरण येथे टपाल कार्यालय सुरू करणे गरजेचे आहे. याकरता लवकरच नवीन टपाल कार्यालय सुरू केले जाणार आहे यासाठी १ हजार २६४ चौरस फूट क्षेत्रफळाची जागेची गरज आहे. टपाल कार्यालयासाठी इच्छुक जागा मालकांनी २८एप्रिल पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन वाशी नवी मुंबई विभागाचे वरिष्ठ डाकघर अधीक्षक मोहम्मद साहिद साहेब यांनी केले आहे. जागा निवडताना




त्या जागेची उपयुक्तता व दैनंदिन पोस्ट ऑफिसच्या कामकाजासाठी सुविधा उपलब्ध असणे गरजेचे आहे अर्जदारांच्या नावे असलेले आवश्यक कागदपत्रे जोडणे बंधनकारक असल्याचे सांगितले जात आहे.



## लोणार सरोवर धारातीर्थ मंदिर येथे जागतिक वारसा दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**लोणार वार्ताहर**

आज लोणार सरोवर धारातीर्थ मंदिर येथे जागतिक वारसा दिन साजरा करण्यात आला या वेळी पुरातत्व विभागाचे शुभम अर्जरिया यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते या वेळी मी लोणारकर टीम चे सचिन कापुरे, शैलेश सदार, रमेश राठोड यांनी वारसा स्थळांबद्दल पर्यटकांना संबोधित केले निसर्ग मल्टिपर्पज चे सर्पमित्र विनय कुलकर्णी व महाराणा प्रताप हाइस्कूल चे शेटे सर यांनी मुलान मार्गदर्शन केले जालना येथील राजगुरू स्वामी यांनी मंदिरांचे महत्व मांडले या नंतर स्वच्छतामोहिम घेण्यात आली तसेच हेरिटेज वॉक चे आयोजन झाले या कार्यक्रमात अनेक मान्यवरानी सहभाग घेतला . दरवर्षी १८ एप्रिल हा दिवस जागतिक वारसा दिन किंवा स्मारके आणि स्थळांसाठी आंतरराष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जातो. आंतरराष्ट्रीय स्मारके आणि स्थळे परिषद या दिवशी सांस्कृतिक वारसा आणि जगातील विविध स्मारके आणि वारसा स्थळांना प्रोत्साहन देते. या दिवसाचे उद्दिष्ट जगातील वारसा स्थळांच्या विविधतेबद्दल आणि त्यांचे संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी आवश्यक असलेल्या प्रयत्नांबद्दल शिक्षित करणे आहे.




## रसायनीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव मोठ्या जल्लोषात साजरी

**दैनिक युवक आधार**
**रसायनीः (आनंद पवार)**

बौद्ध समाज एकीकरण संघ रसायनी परिसर व सम्यंक सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती उत्सव मोठ्या उत्साही वातावरणात धुमधडाक्यात साजरा करण्यात आला. करण्यात आला होता. सायंकाळी रिस येथूनच भव्य दिव्य मिरवणुक निघाली.डीजे व ढोल ताशांच्या गजरात फटाकांच्या आताषबाजीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व महापुरुषांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दणाणून निघाला मिरवणुकीत मोठ्या संख्येने आबालवृद्ध सहभागी झाले होते.रिस येथून निघालेल्या मिरवणुकीचे ठीक ठिकाणी मोठ्या उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे विविध राजकीय, सामाजिक,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पहार घालून अभिवादन केले. मिरवणुकीत माजी सरपंच संदीपशेठ मुंढे, रोशन राऊत,बबलू मुकादम,शिवसेनेचे संपर्कप्रमुख अनिलशेठ पिंगळे,लायन ग्रुपचे जितेंद्र फडके,उपाध्यक्ष रवी शेळके,खजिनदार संदेश लहाने, चेतन गायकर,चांभाली ग्रामपंचायतीचे मा. उपसरपंच दत्ताशेठ जांभळे,सद्‌गुना पाटील, भारतीय जनता पार्टीचे पंचायत समिती संपर्कप्रमुख सचिन दुर्गे, रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद जाधव, पोलीस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर,यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केले.कुठेही अनुचित प्रकार घडू नये म्हणून रसायनी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. सदर मिरवणूकची सांगता एच.ओ. सी. कॉलनीतील आंबेडकर भवनात झाली.रात्री ओके इंटरटेटमेंट प्रस्तुत भीम गीतांचा कार्यक्रम नरेश देवळेकर,फुलचंद लोंढे,सुहास आंबवणे, समीर यादव,शेखर मते, यांनी सुंदर रित्या सादर केला.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बौद्ध समाज एकीकरण संघाचे प्रवीण खंडागळे, दीपक इंगळे,सम्यंक सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाशशेठ गायकवाड, गणेश जावळे,तायडे सर,ऑल इंडिया पँथर सेनेचे पनवेल तालुका मा.अध्यक्ष दयानंद सरवदे,सुदेश जाधव,महादेव कांबळे,मोहन कांबळे, अजित कडलक, सिद्धार्थ कांबळे,प्रवीण गायकवाड धम्मपाल खंदारे,प्रज्योत लोंढे, आकाश सोनवणे, आकाश गायकवाड, आदींनी विशेष मेहनत घेतली.

## पनवेलच्या स्वस्तिका घोषला महाराष्ट्रातील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार प्रदान

**पान १ वरून** खेळाचा सराव करीत असते. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वस्तिकाच्या या यशाचे संपूर्ण श्रेय जनार्दन शिक्षण प्रसारक संस्था, लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जात असल्याची प्रतिक्रिया संदीप घोष यांनी देत त्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे त्यांनी आभारही व्यक्त केले आहेत.

**- अभिमानास्पद आणि प्रेरणादायी**

पनवेलच्या स्वस्तिका घोषने शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार मिळवून संपूर्ण पनवेलकरांचे नाव उज्ज्वल केले. टेबल टेनिसमध्ये तिचं सातत्याने दिलेले योगदान, देश-विदेशातील कामगिरी आणि कठोर मेहनतीचा परिणाम म्हणजे हा पुरस्कार! स्वस्तिकाचा प्रवास केवळ खेळाडू म्हणूनच नव्हे, तर विद्यार्थिनी म्हणून खूप प्रेरक आहे. शाळेपासून ते महाविद्यालयापर्यंत शिक्षणात आणि खेळातही समतोल राखणं हे सोपं काम नाही. या वाटचालीत तिच्या वडिल व प्रशिक्षक, शाळा-महाविद्यालयाचा आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा पाठिंबा खूप मोलाचा ठरलेला आहे.

# लिव्हर सिऱ्होसिस पूर्णपणे बरा होऊ शकतो का?

**डॉ. रावसाहेब राठोड, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजिस्ट, यकृत तज्ज्ञ आणि एंडोस्कोपिस्ट, मेडिकव्हर हॉस्पिटल्स,**

**दैनिक युवक आधार**
**खारघर, नवी मुंबई**

लिव्हर सिऱ्होसिस ही अशी स्थिती आहे ज्यामध्ये यकृताच्या निरोगी ऊती मृत पावतात. त्यामुळे शरीरातील रक्त प्रवाहाच्या मार्गात अडथळे निर्माण होतात तसेच आपले यकृत त्याचे कार्य सुरळीतपणे पार पाडू शकत नाही. अशा स्थितीत शरीराच्या गरजेनुसार प्रथिनं तयार होत नाहीत. यकृताला रक्त शुध्द करणे, अन्नाचे पचन आणि ऊर्जेची पातळी साठवणे यासारखी महत्त्वाची कार्ये करणे आव्हानात्मक ठरते. यकृताचे जेव्हा गंभीर नुकसान होते आणि कालांतराने त्याची वारंवारता वाढते तेव्हा ते नैसर्गिकरित्या बरे होण्याची क्षमता गमावू शकते. यकृताचे नुकसान हे अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे, क्रॉनिक हिपॅटायटीस बी किंवा सी, फॅटी लिव्हर किंवा इतर यकृत संसर्गामुळे होऊ शकते. कालांतराने, तुमच्या यकृतास आवश्यक पोषक तत्वे, हार्मोन्स आणि शरीरातील टाकाऊ पदार्थांवर प्रक्रिया करण्यासाठी संघर्ष करावा लागतो जे तुमच्या संपुर्ण आरोग्यावर परिणाम करते. सुरुवातीच्या टप्प्यात, लिव्हर सिऱ्होसिसची लक्षणे चटकन दिसून येत नाहीत. पण हा आजार जसजसा वाढत जातो तसतसा थकवा येणे, त्वचा आणि डोळे पिवळे पडणे (कावीळ), जखम होणे, पाय किंवा पोटास सूज येणे, गोंधळ उडणे किंवा वजन कमी होणे यासारखी लक्षणे दिसू शकतात. सिऱ्होसिस बहुतेकदा प्रगत टप्प्यात आढळून येईपर्यंत तो लक्षात येत नाही कारण त्याची लक्षणे हळूहळू विकसित होतात. सिऱ्होसिस हा एक मंद गतीने वाढणारा आजार आहे. त्याच्या वेळीच निदानाने भविष्यातील गुंतागुंत टाळता येऊ शकते.

**निरोगी यकृतासाठी करा योग्य आहाराची निवड**

सिऱ्होसिस पुन्हा होऊ शकतो की नाही हे तो कोणत्या टप्प्यात आहे यावर अवलंबून असते. जर तुम्ही सुरुवातीच्या टप्प्यात असाल तर मूळ कारण शोधून त्यावर उपचार करणे जसे की अल्कोहोलचे सेवन टाळणे, हिपॅटायटीसवर उपचार करणे किंवा फॅटी लिव्हर असल्यास वजन नियंत्रित करणे योग्य राहिल. एखाद्याने हे समजून घेतले पाहिजे की हे नुकसान पूर्णपणे कमी करता येत नसले तरी जखम अथवा व्रण टाळता येऊ शकतात किंवा त्याची गती कमी केली जाऊ शकते. प्रगत टप्प्यात ते सहसा बरे होत नाही. कारण निरोगी पेशींवर चट्टे पडल्यानंतर त्यांना सामान्य ऊतींमध्ये बदलता येत नाही. या टप्प्यावर उपचार हे पेशींचे होणारे नुकसान कमी करण्यावर, लक्षणे व्यवस्थापित करण्यावर आणि यकृत निकामी होणे किंवा अगदी कर्करोगासारख्या पुढील गुंतागुंत रोखण्यावर अधिक लक्ष केंद्रित करतात. गंभीर प्रकरणांमध्ये, यकृत प्रत्यारोपणाची आवश्यकता भासू शकते. म्हणूनच ही स्थिती वेळीच ओळखणे गरजेचे आहे. नियमित आरोग्य तपासणी करून वेळीच निदान करणे शक्य आहे. यकृताचे आरोग्य सुधारण्यासाठी निरोगी जीवनशैलीचा अवलंब करण्याचा सल्ला तज्ज्ञांकडून दिला जातो. यामध्ये मद्यपानाचे सेवन टाळणे, पुरेसे पाणी पिणे, वजन नियंत्रित राखणे, संतुलित आहाराचे सेवन करणे, नियमित व्यायाम करणे आणि पुरेशी झोप घेणे याचा समावेश आहे.

## भेंडखळ गावाजवळ झालेल्या भीषण अपघातात मोटार सायकलस्वर जागीच ठार

दैनिक युवक आधार
महाराष्ट्र प्रतिनिधी/प्रदीप पाटील



गुरुवार दि.17 मार्च रोजी उरण-भेंडखळ गावाच्या स्मशानभूमी समोर सायंकाळी 6:00 वाजण्याच्या सुमारास अवजड कन्टेनर ट्रेलर व ॲटीव्हा स्कुटीयाच्या झालेल्या



धडकेमध्ये मोटार सायकल स्वार जागीच ठार झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.तर दुचाकी स्वार हे नवीनशेवा गावांतील रहिवासी असल्याने गावात दुःखाचे सावट पसरले आहे. भेंडखळगावाजवळील स्मशानभूमी कडुन उरणकडे जाणाऱ्या मार्गावर हा अपघात झाला आहे.सदरचा मार्ग हा विशेषतः अवजड वाहनचा रहदारीचा असून गावा शेजारी अनेक कन्टेनरयार्ड आहेत शिवाय या मर्गावर बीपीसीएल कंपनीचा एलपीजी प्रकल्प ही असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात अवजड टँकर रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभेकरून ठेवण्यात आलेलेले असतात, पार्किंग करून ठेवण्यात आलेल्या अवजड वाहनांमुळे रस्ता पूर्णपणे वापरता येत नाही.अशी परीस्थी नेमकी कुणामुळे झाली हा संशोधनाचा विषय आहे. मात्र काल सायंकाळी भेंडखळगावा समोरील स्मशानभूमी समोर कन्टेनर ट्रेलर क्र. MH 46 BM1826 ची जोरदार धडक ॲटीव्हा स्कुटी क्र. MH43 AE 4210 ला बसल्याने सदरचा भीषणअपघात झाला. या अपघातामध्ये ॲटीव्हा स्कुटी चालक नारायण भोईर हे जागीच ठार झाले. त्यामुळे परिसरात खळबळ माजली असून रस्त्याच्या दोन्ही बाजूला मोठया प्रमाणात अनधिकृतपणे पार्किंग करून ठेवलेल्या अवजड कन्टेनर ट्रेलर व अवजड टँकरमुळे असे अपघात होतात असे येथील स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे.नारायण भोईर हे नवीन शेवा गावचे रहीवासी असल्याने घटना समजताच नवीन शेवा ग्रामस्थांनी त्वरित घटना स्थळाकडे धाव घेतली उरण पोलिसांनी आपली प्रथमिक तपास व कार्यवाही पूर्णकेल्या नंतर ग्रामस्थांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नाकार दिला आहे.सदरघटनेचा उरणपोलीस अधिक तपास करीत आहेत.

## पनवेल वकील संघटनेतर्फे करण्यात आला नवनियुक्त न्यायाधिश कु.वंदना चामले व ऋषिकेश पाटील यांचा सत्कार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

पनवेल वकील संघटनेचे सदस्य असलेले नवनियुक्त न्यायाधीश कु. वंदना अरविंद चामले व ऋषिकेश सुनील पाटील यांचा पनवेल वकील संघटनेतर्फे पनवेल न्यायालय येथील वकील रूम येथे सत्कार आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, सचिव प्रल्हाद खोपकर, निवृत्त न्यायाधीश हवेलीकर, ज्येष्ठ वकील सुरेश खानावकर, ज्येष्ठ वकील जगदीश उरणकर, अधिवक्ता परिषद, रायगड जिल्ह्याचे महामंत्री ज्येष्ठ वकील सुनील तेलगे, ॲड.अरविंद चामले हे प्रामुख्याने हजर होते. सदर प्रसंगी नवनियुक्त न्यायाधीश कु. वंदना अरविंद चामले यांचा सत्कार निवृत्त न्यायाधीश हवेलीकर यांनी केला. तसेच नवनियुक्त न्यायाधीश ऋषिकेश सुनील पाटील त्यांचा सत्कार ज्येष्ठ वकील सुरेश खानावकर यांच्या हस्ते झाला.



याप्रसंगी पनवेल वकील संघटनेचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ यांनी मनोगत व्यक्त करताना नवनियुक्त न्यायाधीश कु. वंदना अरविंद चामले व ऋषिकेश सुनील पाटील यांचे पनवेल वकील संघटनेतर्फे अभिनंदन व्यक्त करून पुढील कारकिर्दीसाठी शुभेच्छा दिल्या. ॲड. सुरेश खानावकर, ॲड. अरविंद चामले, ॲड.जगदीश उरणकर यांनी देखील आपले विचार मांडले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अधिवक्ता परिषद, रायगड जिल्ह्याचे महामंत्री ज्येष्ठ वकील सुनील तेलगे यांनी केले. या सत्कार समारंभासाठी ॲड धनराज तोकडे ॲड पाटकर, ॲड भूषण म्हात्रे, ॲड प्रशांत भुजबख, ॲड संदीप बटवाल, ॲड अमित पाटील, ॲड आर के पाटील, ॲड इर्शाद शेख आणि इतर वकील मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती दिवशी समाजसेविका,अभिनेत्री करुणा काथखडे यांजकडून मोफत पाणी वाटप

**दैनिक युवक आधार**
**कल्याण प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

महामानव घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याजवळ सत्याग्रह केला.दलित शोषितांना न्याय मिळवून दिला.त्यांच्या बहुमोल शिकवणीचा आदर ठेवून येथील समाजसेविका व अभिनेत्री करुणा काथखडे समाजकार्य करत आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४व्या जयंती दिवशी करुणा काथखडे यांनी सर्वांसाठी कल्याण स्टेशनला मोफत पाणी वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घेऊन




करुणा काथखडे या समाजसेवेचे हे काम त्यांनी अविरतपणे चालु ठेवलेले आहे.त्या समाजाच्या उत्कर्षासाठी विविध समाजउपयोगी उपक्रम राबवित असतात.करुणा काथखडे यांनी बेबसिरीज,गायन,शार्टफील्म मध्ये अभिनयाचा ठसा उमटवलेला आहे.करुणा काथखडे या येथील विविध सामाजिक संस्थांनवर पदाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.तसेच विविध सामाजिक,शैक्षणिक,सांस्कृतिक संस्थांशी त्यांचे घनिष्ठ संबंध आहेत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी करुणा काथखडे यांनी मोफत पाणी वाटवाच्या उपक्रमाचे कौतुक व अभिनंदन होत आहे.याप्रसंगी पाणी वाटप स्टॉलला ब-याच सन्मानिय प्रतिभावंत आंबेडकर अनुयायांनी भेटी देऊन कौतुक कले. करुणा काथखडे यांनी सर्वांना गुलाबपुष्प देऊन स्वागत केले.

## इंग्रजी शिक्षण संस्था चालकांकडून शिक्षणाचे बाजारीकरण मराठी भाषेचा व हिंदू संस्कृतीचा होणारा अपमान थांबवा - मनसे विद्यार्थी सेना आक्रमक

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधीः-**
**जितेंद्र खोडे**

यवतमाळः-शहराला राजकिय, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरेस मोठा शैक्षणिक वारसा लाभला आहे. यवतमाळ शहरासह जिल्हयाभ-यात मोठ्या प्रमाणात शिकवणी वर्गाच्या नावाखाली विद्यार्थ्याकडुन लाखो रुपये फी स्वरुपात उकळले जात आहे. त्यामुळेच दरवर्षी शैक्षणिक क्षेत्रात राजरोसपणे लुट सुरु आहे. खाजगी इंग्रजी माध्यम अनुदानीत व विनाअनुदानीत शिक्षण संस्थामध्ये ११ वी,१२ वी व त्यापुढील विविध शिक्षणासाठीच नाही तर प्ले ग्रुप ते १० वी पर्यंतच्या इंग्रजी शाळांमध्येही वारेमाप फी घेतली जात आहे. शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची यादी जाहिर केली जात असली तरी मॅनेजमेन्ट कोट्यातुन मोठ्या उलाढाली अनेक



संस्था चालक करित आहे.सर्वसामान्य, मध्यमवर्गीय व गरिब कुटुंबावर अन्याय करणारी ही बाब आहे.रोजमजुरी करणारे लाखो रुपये डोनेशन साठी कुठुन आणणार हा खरा प्रश्न आहे. त्यामुळे आपण या गंभीर प्रकरणाकडे तीव्र लक्ष घालुन जिल्हयात सुरु असलेले शिक्षणाचे बाजारीकरण त्वरीत थांबवावे.जिल्हातील काही इंग्रजी माध्यमांच्या शाळांमधे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळूनही प्राधान्य देण्यात येत नसून हिंदी व इंग्रजी भाषेतच विद्यार्थ्यां सोबत बोलल्या जाते हा सर्व प्रकार मुद्दाम मराठी भाषेचा अवमान करण्यासाठीच हेतू पुरस्कार करण्यात येत आहे त्याच बरोबर सर्वात गंभीर म्हणजे काही शाळा मधे हिंदू संस्कृतीचा मुद्दाम अपमान केल्या जात आहे विद्यार्थ्यांना टिकली टीळा लावण्यास बंदी घालण्यात येते हा सर्व प्रकार आम्ही कदापी सहन करणार नाही संस्था चालकांच्या गैर वाजवी शुल्क वाढ व इतर प्रकरणी त्यांच्या कार्यालयात तक्रार पेटी ठेवण्यात यावी, तक्रार करण्यासाठी टोल फ्री नंबर जाहीर करावा व ईमेल आयडी जाहीर करावा, भरारी पथकाकडून धाड सत्र राबविण्यात यावे,नियमाप्रमाणे किती व कशा पद्धतिने शुल्क वाढ करण्यात यावी या बाबत पत्रक काढावे इत्यादी मागण्या करण्यात आल्या आणि शैक्षणिक संस्थाना प्रत्यक्ष भेटी देवुन या गंभीर प्रकरणाची चौकशी करुन शिक्षण संस्था चालकांवर योग्य ती कारवाई करावी. अन्यथा महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेकडुन तिव्र आंदोलन केले जाईल अशा आशयाचे निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे जिल्हाधिकारी यवतमाळ ,शिक्षणाधिकारी(प्राथमिक)शिक्षणाधिकारी माध्यमिक व उच्च माध्यमिक यांना देण्यात आले,प्रस्तुत निवेदन महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे जिल्हाध्यक्ष अभिजीत नानवटकर यांच्या नेतृत्वात देण्यात आले या प्रसंगी प्रमुख उपस्थिती म्हणुन जिल्हाध्यक्ष देवा शिवरामवार, शहर अध्यक्ष ॲड. अमित बदनोरे ,प्रथमेश पाटील ,अमितेश आडे,अश्विन ठाकरे,गौरव दरने,ऋषिकेश हळदे ,अंकुश कराळे ,साईराम कवडे,श्रावण गायकवाड,मिथीलेश दरने,सुमित काकड,साईराम कवडे ,सनी जतकर, शिवा राठोड,आकाश राठोड ,संकेत पवार ,योगेश चव्हाण ,कुंदन राठोड ,अभिषेक पवार ,महेश चव्हाण,अभिषेक आडे,सुमित राऊत,साहिल खांडरे,यश पांगुळ,पार्थ जमदापुरे,आयुष दिकुंट्वार,सत्यम इंगोले,विवेक ठाकरे व शेकडो मन सैनिक व नागरिक उपस्थित होते.

## पुस्तके माणसांना समृद्ध करतात - प्राध्यापक एस आर पाटील,

**दैनिक युवक आधार**
**कोरेगाव**

कोरेगाव ता. वाळवा येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ज्येष्ठ माता मालन शंकर गोंधळी यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साजरी करण्यात आली. त्यानंतर सामुदायिक भीमवंदना करून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व इतर महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर बाल चमुच्या लेझीम पथकाने सर्व पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. अनेक विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संबंधी माहिती सांगितली. त्यानंतर नवभारत ज्ञानवर्धिनीचे संस्थापक समाजरत्न प्रा. एस. आर. पाटील यांनी या जयंतीनिमित्त बाल वयातच मुलांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा अभ्यास व्हावा म्हणून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या योगदानाची अनेक ग्रंथ तसेच राज्यघटनेची प्रत मुलांच्या अभ्यासासाठी बुद्ध विहार येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचन मंडळामध्ये कायमस्वरूपी ठेवण्यासाठी भेट द्यायची संकल्पना विशद केली. हे ग्रंथ कोरेगावच्या लोकनियुक्त सरपंच प्रा. मानसी पाटील यांच्या हस्ते इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रंथांचे मुलांमध्ये




वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून बोलताना सरपंच प्रा. मानसी पाटील यांनी कोरेगावात " गेली पाच वर्षापासून नवभारत ज्ञानवर्धिनी पुणे संस्था वाचन चळवळीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे मोठे कार्य करीत आहे. असे प्रतिपादन केले. तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त गाव व्यसनमुक्त करण्याची घोषणा विजय कांबळे यांनी केली. बी. के. पाटील सरांनी आपल्या मनोगतातून गावात चालू असलेले विविध सार्वजनिक कार्याची माहिती विशद केली. समाजरत्न प्रा. एस. आर. पाटील यांनी " वाचन चळवळीचे महत्त्व सांगताना पुस्तकेच माणसांना समृद्ध करतात. सूर्याच्या तेज्यापेक्षा, चंद्राच्या तेज्यापेक्षा, अग्नीच्या तेज्यापेक्षा, मानवी प्रज्ञा अधिक श्रेष्ठ असते आणि म्हणून ही प्रज्ञा विकसित करण्यासाठी तसेच महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखे बनण्याचा प्रयत्न म्हणून आजच्या या दिवशी हे ग्रंथ सप्रेम भेट दिले जात आहेत. ही बाब गावाच्या दृष्टीने अभिमानास्पद आहे. तसेच ज्ञानदानाच्या निरंतरपणे चालणाऱ्या कार्यात सर्वांच्या योगदानाचे अपेक्षा व्यक्त करतो. " असे प्रतिपादन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष गोंधळी, विजय कांबळे, विपुल गोंधळी, तुकाराम कांबळे, चोखा गोंधळी, अरुण गोंधळी, सचिन कांबळे राजेंद्र कांबळे, मंगेश शिंगाडे, प्रमोद लोंढे, विशाल लोंढे व शिवाजी कांबळे यांनी अथक प्रयत्न केले. या कार्यक्रमासाठी कोरेगावचे माजी सरपंच व्यंकट आबा पाटील, माजी उपसरपंच सगरेआण्णा पाटील, माजी उपसरपंच निवास पाटील, ग्रामपंचायत सर्व सदस्य, कोरेगावचे पोलीस पाटील दिलीप गावडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष कारभारी पाटील, गजानन पाटील, संग्राम पाटील, वाहिद मुझावर, सेवानिवृत्त शिक्षक हंबीर आबा पाटील, सुरेश ( तात्या ) पाटील, आनंदराव परीट, विठ्ठल कुंभार, कोरेगावचे प्रगतशील शेतकरी संपतराव पाटील, नारायण दादा पाटील, उदयसिंह पाटील, मोहन मगदूम. ग्रामसेवक सुतार साहेब, महादेव अण्णा ( चौगुले ) पाटील व कोरेगावच्या विविध संस्थांचे व विविध राजकीय पक्षांचे विविध कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन विजय कांबळे यांनी केले.

## ५०० मिळणार की १५००?

**पान १ वरून** एप्रिल महिन्याचे १५०० रुपये कधी मिळणार याची प्रतीक्षा आहे. राज्य सरकार अक्षय्य तृतीयेला महिलांच्या खात्यात एप्रिल महिन्याचे १५०० रुपये पाठवणार असल्याचे सांगितले जात आहे. प्रत्यक्षात लाडकी बहीण योजनेतील हप्ता कधी मिळतो, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. एकाही पात्र भगिनीस या योजनेतून वगळण्यात आले नसून, सदर प्रक्रियेत दिनांक ३ जुलै २०२४ नंतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही. लाडकी बहीण योजनेतून केवळ ५०० रुपये मिळणार असल्याच्या दाव्यावर बोलताना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सांगितले की, आमचे म्हणणे आहे की, कुठल्या तरी एका योजनेचा लाभ घ्यावा. केंद्राची योजना ही त्यांना मिळेलच. केंद्राच्या योजनेचा आणि राज्य सरकारचा अर्था-अर्थी काहीही संबंध नाही. कारण पंतप्रधान मोदी यांनी ती देशातील शेतकऱ्यांना दिलेली योजना आहे. असे काही असेल तर ही ५०० रुपयांची योजना न घेता १५०० रुपयांचा लाभ घ्यावा. कुठला लाभ निवडायचा हे ऐच्छिक. हे आपण लाडक्या बहिणींवर सोपवले आहे.

दरम्यान, लाडकी बहीण योजनेतील सर्व पात्र लाभार्थी भगिनींना फेब्रुवारी व मार्च महिन्याचा सन्माननिधी ०७ मार्च २०२५ ते १२ मार्च २०२५ या कालावधीत वितरित करण्यात आला. सर्व पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात फेब्रुवारी महिन्याचे १५०० रुपये व मार्च महिन्याचे १५०० रुपये असे दोन टप्प्यात एकूण ३००० रुपये जमा करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

द • ख • ल

## सामाजिक क्षेत्रातील कर्तुत्वान व्यक्तीला पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा मानस.

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिध.**
**रणजीत सिंह ठाकुर**



नेतंन्सा येथील रामतीर्थ संस्थांनचे अध्यक्ष डॉ गजानन बाजड व त्यांच्या संस्थांचे सहकारी त्यांच्या वतीने वाशिम जिल्ह्यातील समाजकार्यात उल्लेखनीय काम करणाऱ्या प्रत्येक क्षेत्रातील व्यक्तीचा मान सन्मान व्हावा व त्या व्यक्तीला प्रोत्साहन मिळण्याकरिता रामतीर्थ संस्थांच्या वतीने उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज करण्याचे आवाहन डॉ गजानन बाजड यांनी केले आहे. त्यामध्ये जीवनगौरव पुरस्कार, आदर्श उद्योग रत्न पुरस्कार, आदर्श कृषी भूषण पुरस्कार, विदर्भ गौरव पुरस्कार, लोक रत्न राष्ट्रीय पुरस्कार, नारीशक्ती पुरस्कार, इत्यादीसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत तरी इच्छुकांनी समाजकार्य करणाऱ्या व्यक्तींनी रामतीर्थ संस्थांचे अध्यक्ष डॉ, गजानन बाजड. मु,पो, नेतंसा, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम. या पत्त्यावर पोस्टाद्वारे अर्ज व कार्य केल्याबद्दलचे फोटो पाठवावेत. त्या व्यक्तीचा शील्ड, शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. आलेल्या अर्जातून त्याची निवड करण्यात येईल. त्याबाबतचे अर्ज १६ मार्च ते २८ एप्रिल २०२५ पर्यंत पाठवावे असे आवाहन,डॉ. गजानन बाजड (मा.पं.स.सदस्य, रिसोड ) यांनी केले.पत्ता–अध्यक्ष रामतीर्थ संस्थान, डॉ गजानन बाजड मु.पो.नेतंन्सा ता.रिसोड जी.वाशीम.

### पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ ॲम्बुलन्स सेवा वारंवार बंद, गंभीर रुग्णांना जीव गमवण्याची वेळ

## आरोग्य प्रशासन झोपेत? चौकशी करून कारवाई करा :- अंगद सांगळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा वारंवार बंद राहत असल्याने संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी या सेवेसाठी कॉल केल्यास अम्बुलन्स उपलब्ध नसेल,किंवा गाडी बंद आहे असे सांगण्यात येते. या मुळे गंभीर रुग्णांच्या नातेवाईकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. नुकत्याच एका प्रकरणात रात्रीच्या सुमारास एका गंभीर रुग्णाला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागत असताना १०८ अम्बुलन्स उपलब्ध झाली नाही. नाईलाजाने खाजगी वाहनातून बीडला हलवावे लागले. वेळेवर उपचार न मिळाल्याने रुग्णाची प्रकृती अधिकच बिघडली या मुळे पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ अम्बुलन्स सेवा २४x७ सुरु ठेवण्यात यावे तसेच वारंवार बंद राहणाऱ्या अम्बुलन्स सेवेबाबत उच्चस्तरीय चौकशी करणे, दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कारवाई करणे स्थानिक प्रशासनाने या गंभीर समस्येकडे लक्ष देऊन त्वरित उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांच्या जीवाशी खेळल्याचा आरोप निश्चित होईल. या संदर्भात जिल्हा आरोग्य अधिकारी, तहसील प्रशासन आणि आरोग्य मंत्रालयाने लक्ष देण्याचे गरजेचे आहे नसता मोठी दुर्घटना होऊ शकते. या मुळे तात्काळ पाटोदा ग्रामीण रुग्णालयातील १०८ अम्बुलन्स सेवा वारंवार बंद का असते यांची चौकशी करून कारवाई करण्यात यावी. अशी मागणी युवा नेते अंगद सांगळे व पाटोदा zतालुक्यातील सर्व सामान्य नागरिक करत आहे.






## तरुण बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर) :**



सकाळी कामाला जातो असे सांगून घराबाहेर पडलेला एक तरुण अद्याप घरी न परतल्याने तो हरविल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.
महेश प्रेम चव्हाण (22 रा.एन.के.गार्डन वावंजे) असे या तरुणाचे नाव असून बांधा मध्यम, उंची 5 फुट 5 इंच, केस काळे वाढलेले, डोळे काळे, रंगाने गोरा, नाक सरळ, डाव्या हातावर इंग्रजीत मॉम–डॅड असे गोंदलेले असून अंगात मरुन रंगाचा फुल शर्ट व काळ्या रंगाची जि

# विठुमाऊलीचे मंदिर उभारले जात आहे लंडनमध्ये.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी**

पंढरपूरची विठू माऊली हे वारकरी संप्रदायाचे प्रमुख दैवत मानले जाते. विठोबा, विठ्ठल,
विठुराया,माऊली, पांडुरंग किंवा पंढरीनाथ या नावाने विठ्ठलाला संबोधले जाते. मुख्यता भारताच्या महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यात या देवतेला पुजले जाते. सामान्यतः विठ्ठल म्हणजे विष्णूचा एक अवतार कृष्णाचे ही रूप मानले जाते. पंढरपूर मधील विठ्ठलाचे आता थेट यूके मधील लंडनमध्ये मंदिर उभारले जात आहे. आणि विठ्ठलाच्या या मंदिरासाठी पंढरपूर मधून विठोबाच्या पादुका घेऊन दिंडी निघाली. विठ्ठल नामाचा गजर गळ्यात टाळ घेऊन पंढरपूरहुन लंडन कडे निघालेल्या वारीसाठी विठ्ठलाच्या पादुका विठ्ठल मूर्तीला स्पर्श करून निघाल्यात. मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी विठ्ठलाच्या आणलेल्या पादुका तिला स्पर्श करून त्याची विधिवत पूजा करून लंडनवासियांकडे सुपूर्त केल्या. यानंतर हरिनामाच्या जयघोषात विठ्ठल भेटीने या पादुका विठ्ठल स्वरूप होऊन लंडन





कडे प्रस्थान केले आहे. या प्रवासासाठी रस्ते मार्गाचा तसेच वाहनाचा उपयोग करून ही दिंडी प्रवास करणार आहे. १८ एप्रिल रोजी ही दिंडी भारतातून नेपाळमध्ये प्रवेश करेल व पुढे चीन रशिया युरोप अशा २२ देशातून ७० दिवसात १८०० किलोमीटर एवढा प्रवास करत कारने या पादुका लंडन येथे पोहोचणार आहेत. त्या ठिकाणी सहा एकर परिसरात विठ्ठल–रुक्मिणींच्या भव्य मंदिराचे काम सुरू झाले आहे. मूळचे नागपूरकर असलेले पण युकेमध्ये स्थायिक झालेले उद्योजक तुषार गडेकर व अनिल खेडकर यांच्या पुढाकाराने लंडन येथे श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर साकारले जात असून अनिल खेडकर हे या पंढरपूर ते लंडन दिंडीचे नेतृत्व करत आहेत. दिंडीतील पादुकांचे मंदिर समितीचे भारतातील समन्वयक मोहन पांडे यांच्या हस्ते पूजा व आरती करण्यात आली. अनिल खेडकर यांनी या पंढरपूर ते लंडन वारी मागची संकल्पना स्पष्ट केली आहे. ते म्हणाले की, "श्री विठ्ठलाच्या पादुका ज्या सोनाराने घडवल्या त्यांनीच त्या वारीतील पादुका देखील घडवल्या असून त्या पंढरपुरातील श्री विठ्ठलाच्या स्पर्शाने पुनित झाल्या आहेत. पांडुरंग आणि वारकरी संप्रदायाचा वारसा लंडन येथे पोहोचवण्याचा वारी मागचा उद्देश असून लोकांचा यासाठी उदंड प्रतिसाद लाभत आहे" असे ते म्हणाले.

## सोन्याचे मंगळसूत्र आणि मोबाईल फोनची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

राहत्या घराच्या उघड्या गॅलरीतून घरात प्रवेश करून चोराने सोन्याचे मणी मंगळसूत्र आणि मोबाईल फोनची चोरी केली. या प्रकरणी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. नेहा गुप्ता या तळोजा फेस वन येथे राहत असून त्या रूमचे गॅलरी ओपन करून झोपल्या होत्या. चोराने घराच्या उघड्या गॅलरीतून आत प्रवेश केला. आणि सोन्याचे दागिने आणि ३ मोबाईल चोरून नेले.

====

## एसटीने प्रवास करताना बॅग मधील दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

डोंबिवली ते रामवाडी पेण असे एसटी बसने प्रवास करणाऱ्या महिलेच्या बॅगेतील 92 ग्राम वजनाचे सोन्याची गंठण आणि सोन्याचा मंगळसूत्र चोरीला गेल्या प्रकरणी चोराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शुभांगी पाटील ह्या जिमखाना रोड, अजबेपाडा, डोंबिवली पूर्व येथे राहत असून त्या डोंबिवली येथून बॅग मध्ये सोन्याचे गंठण, मंगळसूत्र घेवून निघाल्या. त्या आणि त्यांची मुलगी डोंबिवली एसटी डेपो येथून बसमध्ये बसल्या. त्यांनी डोंबिवली ते रामवाडी पेण असे तिकीट काढले व बॅग बाजूच्या पॅसेजमध्ये पायाजवळ ठेवली. एसटी प्रवाशांनी पूर्ण भरली होती. यावेळी त्यांच्या मुलीला व त्यांना झोप लागली. त्यांना कळंबोली येथे जाग आली. त्यानंतर एसटी बस पनवेल येथे दुपारी तीन वाजता पोहोचली. एसटीचा टायर पंचर झाल्याने एसटी कार शेडमध्ये गेली. त्यामुळे त्या एसटीमध्ये बसलेल्या होत्या. पंक्चर काढून झाल्यानंतर एसटी डेपो मध्ये आली व पुढे जाण्यासाठी निघाली. त्यांनी मुलीला खाऊ देण्यासाठी बॅगेची चैन उघडून बॅगेत हात घातला. यावेळी त्यांनी दागिन्यांचा बॉक्स चेक केला मात्र दागिन्यांचा बॉक्स सापडून आला नाही. बस मधील अनोळखी इसमाने त्यांचे दागिने चोरून नेले. 14 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

====

## आयफोनची विक्री करून रकमेचा केला अपहार

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर

आयफोनची विक्री करून बनावट बिले तयार केली आणि ग्राहकाकडून स्वीकारलेल्या रोख रकमेचा अपहार केल्या प्रकरणी आरोपी अशोक घराई (राहणार मानखुर्द) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. मयूर गावडे हा आय प्लॅनेट स्टोअर ओरियन मॉल, पनवेल येथे स्टोअर मॅनेजर म्हणून काम करतो. त्यांच्याकडे पवई स्टोर येथून अशोक घराई हा कॅश हाताळण्यासाठी आला होता. 12 मार्च रोजी दुकानांमधून नऊ आय फोनची किंमत बारा लाख 37 हजार 740 रुपये कंपनीच्या बँक खात्यात जमा झाले नसल्याचे निदर्शनास आले. कॅशियर चे कोड पडताळणी केले असता अशोक घराई याने दुकानांमध्ये असलेल्या क्रेडिट कार्ड मशीन मध्ये बनावट लिंक बनवून त्यामार्फत बिलिंग सॉफ्टवेअर मध्ये बनावट मान्यता प्राप्त कोड तयार केला आणि बनावट दिले तयार करून नऊ फोन स्टोअर मधून विक्री केले. या आयफोनची विक्री करून त्याने ग्राहकाकडून स्वीकारलेली रोख रक्कम दुकानामध्ये जमा केली नाही.

# कार्यकर्ता संवाद बैठक किनवट खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड :** किनवट येथे किनवट माहूर मतदार संघाची कार्यकर्ता सवांद बैठक खा.कल्याण काळे साहेब पक्ष निरीक्षक मा.खा.तुकाराम रेंगे साहेब जिल्हा प्रभारी,खा.रविंद्र वसंतराव चव्हाण साहेब यांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये किनवट माहूर मतदारसंघातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्याची संवाद बैठक पार पडली आहे यावेळी जिल्हाध्यक्ष बी.आर.कदम, श्रवण रॅपणवाड प्रदेश कॉंग्रेस सचिव, केदार पाटील साळुंके प्रदेश कॉंग्रेस, सूरेंद्र घोडजकार प्रदेश सदस्य, बालाजी गाढे जिल्हाध्यक्ष युवक कॉंग्रेस, सूर्यकांत रेड्डी किनवट तालुका अध्यक्ष, के मूर्ती.मा.नगराध्यक्ष, बाळासाहेब देशमुख,अध्यक्ष माहूर,निरंजन केशव युवक सरचिटणीस, श्रीमती शेख शहनाज महिला तालुका अध्यक्ष, गिरीश नेमानिवार किनवट शहर अध्यक्ष , अनुप देशमुख युवक कॉंग्रेस जिल्हाउपाध्यक्ष ,वसंत राठोड ओबीसी शहर जिल्हा उपाध्यक्ष,ईश्वर चव्हाण प्रदेश



सचिव ,गजानन जाधव, विजय एन टी सेल जिल्हाउपाध्यक्ष, सुभाष बाबू नाईक सचिव ओबीसी सेल,फारुक चव्हाण सोशल मिडिया किनवट, सुभाष बाबुलकर जेष्ठ कार्यकर्ते, जेवाद आलम माजी जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी सेल, शरद कोपलीवर, शिराज जीवाने, समशेर खीची, ईश्वर चव्हाण, किशन राठोड, वसंत राठोड, जवाब आलम, सुभाष नाईक, मंचकरराव देशमुख, आनंद तूपदाळे, लक्ष्मीपती दोन पल्लीवार सत्तार किमी सुभाष पाटील अभय महाजन, के रुखमाजी, प्रीती मनेश्वर, जयश्री भरणे, सुभाष राठोड कळकुडवाड, व ईतर मान्यवर उपस्थित




# नविन पनवेल शहरात रविवारी सकल मराठा समाजाचा वधु-वर, पालक परिचय मेळावा

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (विशेष प्रतिनिधी) –** नविन पनवेल येथे रविवारी (दि.२७) सकाळी १० वाजता सकल मराठा समाजाचा मराठा वधु–वर ,थेट–भेट व पालक परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्याला राज्यभरातून रायगड, सिंधुदुर्ग, ठाणे, नवी मुंबई, मुंबई,पुणे व इतर जिल्ह्यातून सुमारे शेकडो वधू–वर व त्यांचे पालक येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे. शहरातील कर्नाटक संघ पनवेल,प्लॉट नं.२९, सेक्टर २, नविन पनवेल येथे हा मेळावा आयोजित करण्यात आलेला आहे. या मेळाव्याचे आयोजन सकल मराठा सोयरीक ग्रृपच्या राज्याध्यक्षा,शिवमती मायाताई दत्तात्रय जगताप पाटील,जिजाऊ ब्रिगेड अंतरराष्ट्रीय उपाध्यक्षा शिवमती संपुर्णाताई सावंत,शिवमती आयोध्याताई जगताप यांनी सगेसोयरे वधु–वर सेवा केंद्र, सकल मराठा सोयरीक ग्रृपच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन केले असून, शिवश्री हरीभाऊ जगताप पाटील सर्व सहकार्यांनी मेळावा यशस्वी होण्यासाठी सर्वदूर संपर्क दौरा केला आहे. पाहणी संपर्क परिचयातून मेळाव्यातच २० ते २५ विवाह मार्गी कसे लागतील, यासाठीसुध्दा आयोजकांचा प्रयत्न असणार आहे. या शिवाय, या मेळाव्यात विवाहासाठी समुपदेशन, वधु–वर परिचय, विवाह संस्कार महत्त्व, उपवर मुले मुली व संबंधित पालकांना समुपदेशन, विवाहात येणारी अडथळे, विवाह समस्यांवर मार्गदर्शन, उपवर मुले, मुली यांना विवाह ठरवताना घ्यावयाची काळजी व त्यावर मार्गदर्शन तसेच अविवाहित, घटस्फोटीत, विधवा, विधुर यांच्यासाठी स्थळे उपलब्ध असून, विवाह पूर्व व विवाहोत्तर येणाऱ्या समस्यांवर पालक कुटुंबीयांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. यावेळी शिवश्री. शहाजीराजे भोसले,संस्थापक अध्यक्ष ई एम पॉवर ग्रुप रायगड जिल्हा, प्राचार्य हनुमंत चव्हाण, शिवमती, रेवती कदम
रायगड/सिंधुदुर्ग जिजाऊ ब्रिगेड विभागीय अध्यक्ष यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभणार आहे. वधु व वरांचा परिचयाबरोबरच कुंडली गुणमिलन, नाडीदोष,ब्लडग्रुप, मंगळ ई.अधश्रध्दावरील शास्त्रीय मार्गदर्शन याबाबतही मान्यवर समाजाला प्रबोधन करणार आहेत. पालकांना एकाचवेळी एकाच ठिकाणी शेकडो स्थळे पाहण्याची/ प्रत्यक्ष भेटण्याची संधी उपलब्ध होणार आहे. त्यासाठी जास्तीत जास्त नावे नोंदविण्यासाठी वधु–वर व पालक मेळावा समितीमधील स्वयंसेवक सदस्य हे प्रयत्न करत आहेत. वधू–वर व पालक यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या मेळाव्याचा लाभ घेण्याचे आवाहन संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्ष बाबा सावंत (दक्षिण मध्य मुंबई) सुनिल कोठावळे (दक्षिण मुंबई) काशिनाथ चोरगे (दक्षिण पुर्व मुंबई) सुदाम साहिल (पश्चिम मध्य मुंबई) मिलिंद कदम (ईशान्य मुंबई) सुरेश पवार (उत्तर मध्य मुंबई) तेजस भोईर (पालघर) अमित केळकर (ठाणे मध्य ) चंद्रशेखर पवार (ठाणे पश्चिम) मारूती खुटवड (नवी मुंबई) परमानंद जांभळे (रायगड उत्तर) विक्रांत वाठोरे (रायगड दक्षिण)भरत सरपरे (रत्नागिरी)रमेश चौधरी(ठाणे) ग्रामविस्तार अधिकारी भोलेनाथ जगताप,तानाजी भोसले व इतर समिती सदस्यांनी केले असून अधिक 9689047270 या क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# तलावातुन बेसुमार पाणी उपसा सुरूच, जिल्हा प्रशासन कागदी घोडे नाचविण्यातच समाधानी भिषण पाणीटंचाईचा सामना करावा लागणार.

### बीड जिल्ह्यातील १६७ प्रकल्पात केवळ २४ टक्के उपयुक्त पाणीसाठा, ४६ प्रकल्प जोत्याखाली तर १२ प्रकल्प कोरडेठाक- डॉ.गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) -** उन्हाचा पारा वाढत असल्याने पाण्याचा वापर आणि बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला आहे. परीणामी तलावातील पाणी दिवसेंदिवस कमी होत आहे. जिल्ह्यातील १६७ प्रकल्पांमध्ये सध्या १८३ दलघमी ( २३.८८ टक्के ) एवढाच उपयुक्त पाणीसाठा आहे. आता १४५ प्रकल्पातील पाणीसाठा निम्म्यापेक्षा कमी आहे. ४५ प्रकल्पातील पाणी जोत्याखाली गेले आहे.




**जिल्हा प्रशासनाचे नियोजन ५९ कोटींचा संभाव्य पाणीटंचाई आराखडा फक्त कागदावरच**

जिल्ह्यात चांगले पर्जन्यमान झाल्याने ८ एप्रिल पर्यंत एक ही टॅंकर सुरू नाही. गतवर्षी एप्रिल मध्ये १५० तर मे आणि जून मध्ये हा आकडा ४६७ वर गेला होता. जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी विभागीय आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई गावे निश्चित करून कृती आराखडा पाठवला आहे. त्यामध्ये २४५२ गावांसह १६७६ वाड्यांसाठी योजना राबविण्यासाठी संभाव्य पाणी टंचाई निवारणासाठी ५८ कोटी ९४ लाख ४९ हजार रुपयांचा आराखडा पाठवला आहे. जुन, जुलै पर्यंत पाणी टंचाईचा सामना करावा लागणार आहे. त्या मुळे विहिर अधिग्रहण, बोअर अधिग्रहण, टॅंकर सुरू करणे, तात्पुरती नळ योजना, जुन्या नळ योजनांची दुरुस्ती, नविन विहीरी खोदणे, विहारीतील गाळ काढणे असा संभाव्य टंचाई आराखडा जिल्हा प्रशासनाने तयार करून आयुक्तांकडे पाठवला आहे. मात्र हा आराखडा केवळ कागदावरच राहु नये तर प्रत्यक्षात अमलात आणावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.

१२ प्रकल्प कोरडे ठाक पडले आहेत. जिल्ह्याची पावसाची वार्षिक सरासरी ५३६ मिलीमिटर आहे. गतवर्षी तब्बल ८३७ मिलीमीटर एवढ्या पावसाची नोंद झाली होती. त्या मुळे सगळे प्रकल्प ओसंडून वाहत होते. परंतु आता प्रकल्पातील पाणी कमी होण्यासह शेतातील विहीरी, सार्वजनिक पाणी योजनेच्या विहिरी, विंधन विहिरी कोरड्या पडत चालल्या आहेत. त्या मुळे ग्रामीण भागात पाणी टंचाईच्या झळांचा सामना करावा लागणार आहे. याच वेळी जिल्हा प्रशासनाने ३१ मार्च रोजी आयुक्तांना संभाव्य पाणी टंचाई निवारणासाठी ५८ कोटी १९ लाख ४९ हजार रुपये निधीची आवश्यकता असल्याचे कळवले असुन तसे नियोजन सुरू आहे. मात्र संभाव्य पाणी टंचाई अनुषंगाने निवासी उपजिल्हाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी अनाधिकृत पाणी उपसा बंद ठेवण्याबाबत तहसीलदारांना दिलेल्या सुचना कागदावरच राहिल्या असुन तालावातुन पाण्याचा बेसुमार उपसा सुरू असल्याचे निदर्शनास आले असुन कागदी घोडे नाचवण्यात जिल्हा व तहसिल प्रशासन समाधान मानत असुन संभाव्य पाणी टंचाई रोखण्यासाठी वास्तविक तहसीलदार यांनी नेमलेल्या पाटबंधारे विभाग, तहसील विभाग, महावितरण विभाग आणि गटविकास अधिकारी कार्यालयातील अधिकारी यांच्या संयुक्त पथकाने अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालावा. अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

**शिवकुमार स्वामी निवासी उपजिल्हाधिकारी बीड यांचे तहसील प्रशासनाला निर्देश मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत**

उन्हाळ्यामुळे पाटबंधारे प्रकल्पातील पाणी साठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्याचा अवर्षण प्रवण ईतिहास पाहता दुर्दैवाने पर्जन्यमानाने ओढ दिल्यास पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता. जिल्ह्यातील पाटबंधारे प्रकल्पाच्या ठिकाणची विद्युत मोटारी व अन्य साधनांद्वारे करण्यात येणारा पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासनाने संबंधित पाटबंधारे विभागाचे अधिकारी, कर्मचारी, तहसील कार्यालयाचे कर्मचारी, गटविकास अधिकारी कार्यालयातील कर्मचारी व महावितरण विभागाचे अधिकारी यांची संयुक्त पथके सर्व तहसीलदार यांनी स्थापित करून अवैध पाणी उपश्यावर प्रतिबंध घालण्यात यावा. व तसा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा अशा सुचना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी दिल्या आहेत. मात्र तहसील प्रशासन गाढ झोपेत असल्याचे दिसून येत आहे.

## कोकण विभागीय महिला उपाध्यक्षपदी ॲड. योगिता सावंत यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**मुबंई प्रतिनिधी**



दैनिक युवक आधार या वृत्तपत्राच्या प्रतिनिधी व सक्रिय पत्रकार म्हणून कार्यरत असलेल्या ॲड.योगिता दशरथ सावंत यांची 'युवा ग्रामीण पत्रकार संघ' या राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संघटनेच्या कोकण विभागीय महिला उपाध्यक्ष पदावर नुकतीच नियुक्ती करण्यात आली आहे.
या पदासाठी माझ्या नावावर विश्वास दाखवत ही संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. गणेश रामराव कचकलवार यांचे मन:पूर्वक आभार मानते.
या नव्या जबाबदारीमुळे कोकण विभागातील ग्रामीण भागातील महिला पत्रकारांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी व हक्क प्रभावीपणे मांडण्यास संधी मिळेल. पत्रकारितेतील महिलांचे प्रतिनिधित्व वाढवणे, त्यांना आवश्यक प्रशिक्षण व व्यासपीठ उपलब्ध करून देणे, तसेच ग्रामीण पत्रकारितेचा दर्जा उंचावणे हा माझा प्राधान्यक्रम असेल.
युवा ग्रामीण पत्रकार संघ ही संघटना ग्रामीण पत्रकारांना एकत्र आणून त्यांच्यासाठी धोरणात्मक, शैक्षणिक आणि सामाजिक पातळीवर काम करते. या संघटनेच्या माध्यमातून कोकण विभागातील पत्रकारांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी मी कटिबद्ध आहे.
ही जबाबदारी हे केवळ पद नसून, एक सामाजिक बांधिलकी आणि जनतेपुढे उत्तरदायित्व मानून मी हे कार्य पार पाडेन, असा माझा दृढ विश्वास आहे.

# "महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षेत "वंदना सुरेखा बाबू गाईंगडे"यांचे यश"

**दैनिक युवक आधार**

**(अरुण पाटकर)** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एप्रिल/मे २०२३च्या दरम्याने घेतलेल्या परीक्षेचा निकाल नुकताच दोन दिवसांपूर्वी.जाहीर करण्यात आला. यामध्ये महाराष्ट्रातील अनेक उमेदवारांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. मुलींमध्ये आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांच्या गटात "वंदना सुरेखा बाबू गाईंगडे" या मुलीने महाराष्ट्रात नववे स्थान प्राप्त केले आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील आजरा तालुक्यातील "येमेकोंड"या गावची शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेली या मुलीने यश मिळवून कुटुंबाचे नाव उज्वल केले आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग परीक्षेसाठी वंदना गाईंगडे हिने ऑनलाईन क्लास आणि स्वतंत्र अभ्यास केला होता. अतिशय खडतर परिश्रम करून करून यश मिळविले आहे .यासाठी तिला तिचे मोठे बंधू दिगंबर बाबू गाईंगडे यांचे भरपूर प्रोत्साहन आणि मार्गदर्शन लाभले त्याबरोबरच आई सौ.सुरेखाआणि वडील बाबू गाईंगडे यांनी सुद्धा खंबीर पणे साथ दिली असे तिने सांगितले आहे. वंदना गाईंगडे हिच्या यशाबाबत नातेवाईक आणि दि आजरा अर्बन सहकारी बँकचे संचालक आणि माजी उपनगराध्यक्ष विलास इंदिराबाई अन्नासो नाईक, (मावसमामा,आजरा), सौ. अनिता विलास नाईक (माजी सभापती, पंचायत समिती आजरा) पॉवरलिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन रायगड चे सचिव अरुण यशोदा लक्ष्मण पाटकर(मावस मामा) आणि आजरा अर्बन सहकारी बँकेचे माजी शाखाधिकारी आणि मराठा समाज कार्यकर्ते सुरेश उर्फ बंडा गणपत कातकर(आजरा), सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक बबन आकूबाई विष्णू बोलके( रा.बोलकेवाडी),डॉक्टर स्वप्नील स्मिता सुरेश कातकर(आजरा), श्रीमती इंदुबाई मारुती दोरुगडे(सोहाळेवाडी) दत्ता गौरा बाळू कातकर,(आजरा) महादेव लक्ष्मण पाटकरआणि परीवार(मुंबई) जयश्री महादेव घेवडे(आजरा, भटवाडी), गीता धनाजी आजगेकर(पेद्रेवाडी आजरा), सुरेश शिवाजी सोनुर्ले(भटवाडी,आजरा) विशाल वर्षा नामदेव सुपल(कल्याण) यांनी आनंद व्यक्त करून अभिनंदन केले आहे. तिच्या उल्लेखनीय या यशाबाबत तिचा कौटुंबिक सत्कार लवकरच आजरा येथे नामवंत व्यक्ती,
नातेवाईक यांचे उपस्थितीत करण्याचा मानस अरुण पाटकर यांनी व्यक्त केला आहे.




# स्त्रीयांच्या सर्वांगीण विकासासाठी "महिला चषक" अभिमानास्पद

## मोहिनी विक्रांत पाटील यांचे प्रतिपादन : पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे क्रिकेट स्पर्धा






**दैनिक युवक आधार**
**पनवेल /प्रतिनिधी**

चुल आणि मुल या विश्वातून बाहेर पडत महिला आपले कर्तृत्व विविध क्षेत्रात सिध्द करत आहेत. महिला चषक स्पर्धेत महिलांचा सहभाग कौतुकास्पद आहे.

**पैठणीची लयलूट**

प्रथम आणि व्दितीय विजेत्या संघातील सहभागी सर्वच महिलांना आकर्षक पैठण्या देण्यात आल्या. मनमोहक आणि आकर्षक रंगातील पैठण्या जिंकल्यानंतर या खेळाडूंचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. सकाळपासून स्पर्धास्थळी दाखल झालेल्या खेळाडूंसह प्रेषकांनी दुपारी बिर्याणीवर यथेच्छ ताव मारला. असोसिएशनचे संस्थापक केवल महाडीक, मार्गदर्शक दिपक महाडीक यांनी आयोजन केले.

### उत्कृष्ट गोलंदाज तेजस्विनी काशीद, उत्कृष्ट फलंदाज श्रीवंता सुर्यवंशी, ऑलराउंडर उषा कोरडे

महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी पत्रकार मित्र असोसिएशनचे विविध उपक्रम नक्कीच प्रेरणादायी असतात. जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमिवर झालेला हा महिला चषक अभिमानास्पद आहे असे गौरवोदगार विधान परिषद आमदार विक्रांत पाटील यांच्या सौभाग्यवती मोहिनी विक्रांत पाटील यांनी काढले. पनवेल येथील कर्नाळा स्पोर्टस अकॅडमी येथे श्री. प्रल्हादराय झुलेलाल ट्रस्ट आणि पत्रकार मित्र असोसिएशनतर्फे महिला चषक क्रिकेट स्पर्धा झाल्या. या स्पर्धेचे बक्षीस वितरण आमदार सौभाग्यवती मोहिनी विक्रांत पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी त्या बोलत होत्या. शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक नितीन ठाकरे, कामोठे पोलिस ठाण्याच्या वरिष्ठ पोलिस निरिक्षक विमल बिडवे, पनवेल वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक संजय पाटील, निसर्गोपचार तज्ञ डॉ. पल्लवी पाटील, उपजिल्हा रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. अशोक गिते, डॉ. प्रमोद पाटील, जीवन कोंडीलकर, माजी नगरसेवक अनिल बहिरा, नगरसेविका प्रीती जॉर्ज म्हात्रे प्रमुख पाहुणे होते. सकाळी दहा पासून सुरु झालेल्या स्पर्धा फलंदाज अन् गोलंदाजांच्या उत्साहाने उत्तरोत्तर रंगत गेल्या. या स्पर्धेत एकूण सहा संघ सहभागी झाले होते. पनवेल शहर पोलिस ठाण्याच्या संघाने प्रथम तर कामोठे पोलिस ठाण्याच्या संघाने व्दितीय क्रमांक पटकावला, डॉ. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालय पनवेल संघाने तृतीय क्रमांक पटकावला. अङ मनोहर सचदेव यांच्या सुमधूर आवाजातील क्रिकेट कॉमेंट्रीने प्रेक्षकांची मने जिंकली. राजेश लौटी यांनी हंपायरची भुमिका निभावली.

**स्पर्धेत सहभागी महिला चषक टिम**

पनवेल उपजिल्हा रुग्णालय : ज्योती दिपक गुरव, पुनम परशुराम वाडकर, सुरेखा तपकिरे, वृषाली वायरे, लक्ष्मी नागापुरे, बरखा गौतम, रेश्मा सावंत, शेडगे शर्मिला भरत, पिंकी येलवे, स्वाती नितीन शिंदे, सारिका प्रणव मानकामे, सुनंदा दांडेकर, हर्षदा हर्षद पाटणकर, प्रभा प्रदिप पाटील, नेहा अवधुत चव्हाण. हार्मोनी स्पोर्टस क्लब : गुड्डी, अपर्णा, ज्योती ठाकूर, चैताली, शितल, रितीका, ज्योती मेहरा, अस्मीता. गोदरेज टायटन्स : खुशी घोष, अश्विनी भोसले, श्रीती सिंग, अनुश्री खेडवाल, राजश्री मालो, तेजस्वी घनवट, जमुना सनल क्रीश्ना, पूजा चिंडालीया, सीमा सागर शेठ, शितल सोनवणे, शिल्पा चंदाने. अष्टविनायक फेज २ : रेणूका, शिल्पा, देवश्री, सपना, परुल, रंजना, शमा. गेम चेंजर : मानसी बांगर, सुखदा तेरे, संगीता जाधव, जयश्री परगवकर, पायल घोरमारे, स्मीता शर्मा, अर्चना सिंग, राजश्री कोल्हे, कामोठे पोलिस ठाणे : दिपा पवार, अनुराधा कोळी, श्रीवंता सुर्यवंशी, दिपाली वाघचौरे, सुप्रिया कदम, संजुला मोहिते, प्रिया मोरे, उषा कोरडे, सुप्रिया सरोदे. पनवेल शहर पोलिस स्टेशन :साधना पवार, सुशीला सवार, देवांगी म्हात्रे, ज्योती कांहडळ, वर्षा पाटील, मीरा आंबेकर, इंदू भोईर, तेजस्विनी काशीद, बेस्ट बॉलर

# लालपरी थांबत जा बरी"! देवव्रत विष्णू पाटील यांच्या प्रयत्नांना यश, एस.टी. गाड्या थांबू लागल्या

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
**अलिबाग, १६ एप्रिल**

"सार्वजनिक प्रश्नांवर बोलणं आणि त्यावर कृती करणं यात फरक असतो" हे पुन्हा एकदा सिद्ध केलं आहे अलिबागमधील सामाजिक कार्यकर्ते देवव्रत विष्णू पाटील यांनी. अलिबागहून पनवेल व पेणच्या दिशेने जाणाऱ्या एस.टी. बसगाड्या निलिमा हॉटेलजवळील अधिकृत थांब्यावर थांबत नसल्यामुळे प्रवाशांना होणाऱ्या त्रासाची दखल त्यांनी घेतली आणि प्रशासकीय पातळीवर तात्काळ पाठपुरावा केला. काल (१५ एप्रिल) दुपारी १२:३० ते १:३० या वेळेत अलिबागहून निघालेल्या सहा एस.टी. गाड्यांनी ठरलेल्या थांब्यावर थांबण्याचे टाळले. यामुळे प्रवाशांमध्ये अस्वस्थता पसरली. ही बाब लक्षात घेत देवव्रत पाटील थेट अलिबाग एस.टी. डेपोमध्ये गेले व डेपो मॅनेजर श्री. देवरे यांना संपूर्ण परिस्थिती समजावून सांगितली. त्यांनी फक्त निलिमा हॉटेलजवळील थांब्याची नव्हे, तर पोयनाड मार्गे येणाऱ्या गाड्यांनी PNP कॉलेजजवळ थांबण्याच्या मागणीचाही आग्रहाने पाठपुरावा केला. त्यांच्या ठामपणामुळे डेपो प्रशासनाने तात्काळ निर्णय घेत, सर्व ड्रायव्हर व कंडक्टर यांना अधिकृत थांब्यांवर गाड्या थांबवण्याचे आदेश दिले. या निर्णयाचा परिणाम आज लगेच दिसून आला – सर्व गाड्या योग्य ठिकाणी थांबत असल्याचे प्रवाशांनी समाधानाने नमूद केले. विद्यार्थ्यांना विशेषतः मोठा दिलासा मिळाला आहे. देवव्रत विष्णू पाटील हे या परिसरात सतत सामाजिक प्रश्नांसाठी धावपळ करत असतात. स्थानिक समस्या सोडवण्यासाठी प्रशासन दरबारी आवाज उठवणाऱ्या मोजक्या कार्यकर्त्यांपैकी एक म्हणून त्यांची ओळख आहे. "सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी मी नेहमीच तयार आहे," असं ते सांगतात.स्थानिक नागरिकांनीही त्यांच्या या प्रयत्नाचे कौतुक करत, "अशा कार्यकर्त्यांमुळेच बदल शक्य आहे," अशा प्रतिक्रिया दिल्या.



# अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद यवतमाळ तालुकाध्यक्षपदी विद्या परचाके यांची निवड

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**
**यवतमाळ:- (दि.18 एप्रिल)–**

आदिवासी समाजाच्या प्रगतीसाठी सक्रियपणे कार्यरत असलेल्या विद्या परचाके यांची अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद,यवतमाळ तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.ही निवड यवतमाळ येथील गव्हर्नमेंट रेस्ट हाऊस येथे दिनांक 17 एप्रिल( गुरुवार) रोजी पार पडलेल्या विशेष बैठकीत करण्यात आली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद (महाराष्ट्र शाखा) महिला प्रदेशाध्यक्ष,तथा प्रदेश सचिव,महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमिटी मा.नंदिनी टारपे होत्या. यावेळी त्यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन करत सांगितले,"आदिवासी महिलांनी केवळ समस्या मांडत न बसता, त्या सोडवण्यासाठी पुढे यावं,संघटित व्हावं आणि नेतृत्वात भाग घ्यावा.आपलं भविष्य आपल्याच हाती आहे."
या प्रसंगी राजेश टारपे यांनी मनोगत व्यक्त करत,नंदिनी टारपे यांच्या सामाजिक कार्याचा आणि संघर्षाचा उल्लेख केला.तसेच कॉम्रेड सचिन मनवर यांनी जिल्ह्यातील समस्या व उपाययोजनांवर सखोल मते मांडली.प्रा.पंढरी पाठे यांनी विद्या परचाके यांच्या कार्याचा आढावा घेत त्यांचे सामाजिक,शैक्षणिक व आरोग्य विषयक योगदान अधोरेखित केले. नियुक्तीनंतर विद्या परचाके यांनी आपल्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल आभार मानून सांगितले, "तालुक्यातील आदिवासी



समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी मी कटिबद्ध राहीन." बैठकीस मंगला सोयाम,जयश्री मडावी,अनिता सलाम,निशा वाघाडे,संगीता पुरी,संगीता मेश्राम,ऋतुजा महल्ले,प्रा.मोहिनी कुडमेथे,लीना नैताम,सम्यक वाघमारे,रेखा सिडाम,जया मडावी,मुख्याध्यापिका संगीता सिडाम,सचिन भादीकर,वैष्णवी गेडाम,संगीता मडावी,यांच्यासह अनेक मान्यवर महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लाभली.यावेळी कार्यक्रमाचे संचालन निशा वाघाडे,तर आभार अनिता सलाम यांनी मानले.

# रिसोड तहसील येथे अपात्र शिधापत्रिका धारकाची ची शोध मोहीम सुरू

## पुरवठा निरीक्षण अधिकारी गणेश तांगडे यांच्या रेशन दुकानदारांना सूचना

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रिसोड.**
**रणजीत सिंह ठाकुर**



अपात्र रेशन कार्डधारक शासनच्या रडारवर या मोहिमेअंतर्गत अंतोदय व प्राधान्य गटातील व इतर सर्व रेशन कार्ड धारकाकडून संबंधित रेशन दुकानदाराकडून अर्ज भरून घेतले जाणार आहे व ते अर्ज वरिष्ठ स्तरावर तपासले जाणार आहे

रिसोड-रिसोड तहसील ला 15 एप्रिल ला जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या आदेशान्वये व तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्वठा निरीक्षण अधिकारी गणेश तांगडे यांनी मीटिंग बोलावून अपात्र रेशन कार्ड धारक शोध मोहीम बद्दल स्वस्त धान्य दुकानदार यांना मार्गदर्शन करण्यात आले. तालुक्यातील गरजू लाभार्थ्यांना स्वस्त धान्याचा लाभ मिळावा यासाठी तालुक्यात अपात्र शिधापत्रिकाची शोध मोहीम सुरू झाली आहे यामध्ये वास्तव्याचा पुरावा एक वर्षापेक्षा जुना नको ही महत्त्वाची अट आहे पुरावा नसल्यास राशन कार्ड तात्काळ निलंबित करण्यात येणार आहे शिधापत्रिकाधारकांना सवलतीच्या दराने धान्य प्रत्येक महिन्याला देण्यात येते यामध्ये अपात्र लाभार्थी राशन घेत असल्याची शंका येत असल्याने आशा लाभार्थ्यांचा आता शोध घेण्यात येत आहे या मोहिमेअंतर्गत अंतोदय व प्राधान्य गटातील लाभार्थ्याकडून अर्ज भरून घेण्यात येणार आहे 31 मे पर्यंत ही मोहीम राबविण्यात येणार आहे यामध्ये वास्तव्याचा पुरावा रेशन कार्ड धारकाच्या उत्पन्नाची तपासणी करण्यात येईल रेशन कार्ड तपासणी ही नियमित प्रक्रिया आहे या मोहिमेत मृतक व दुबार मुत लाभार्थ्यांची नावे वगळण्यात येणार आहे ज्या कार्डधारकाचे उत्पन्न जास्त आहे अशांना उत्पन्नानुसार राशन कार्ड दिले जाणार आहे एका पत्त्यावर दोन रेशन कार्ड असतील एकाच कुटुंबात विभक्त न राहता दोन रेशन कार्ड दिले असतील तर त्यातील एक रेशन कार्ड रद्द केले जाणार आहे दिलेल्या कालावधीत ही मोहीम सुरू राहणार आहे यामध्ये आर्थिक उत्पन्न वास्तव याबाबत योग्य पुरावे नसल्यास असे रेशन कार्ड रद्द करण्यात येणार आहे

# केंद्रीय योजनांच्या सहकार्याने औषध वनस्पतींची राज्यात लागवड वाढवा केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-सचिन पवार**
**माणगांव रायगड**



माणगांवः आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून राष्ट्रीय औषध नियंत्रण बोर्ड औषधी वनस्पतींची लागवड, संरक्षणाकरीता काम करीत आहे. केंद्र शासन औषधी वनस्पतींच्या संवर्धन, संरक्षणासह मोठ्या प्रमाणावर लागवडीसाठी सहकार्य करण्यास तयार आहे. केंद्र आपल्या विविध योजना आणि उपक्रमांच्या माध्यमातून औषधी वनस्पतींची प्रमाणीत कच्च्या मालाच्या स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी काम करीत आहे, केंद्र शासनाच्या उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर राज्यात औषधी वनस्पतींची लागवड करावी, अशा सूचना केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री तथा आयुष (स्वतंत्र प्रभार) मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज दिल्या. सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीस रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक यांच्यासह संबंधित विभागाचे सचिव, अधिकारी उपस्थित होते.केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव म्हणाले, आपल्या पारंपारिक उपचार पद्धतीमध्ये आयुर्वेद, युनानी, सिद्ध आणि होमिओपॅथी यांचा समावेश आहे.आजार कमी करण्यासाठी सध्याही औषधी वनस्पती गुणकारी आहे. अशा औषधी वनस्पतींचे संरक्षण, लागवड होणे काळाची गरज असून त्यांना वनांमधून प्राप्त करता येत आहे. केंद्र शासनाकडून औषधी वनस्पतींच्या प्रक्रिया उद्योगासाठी आर्थिक मदत देण्यात येते. तसेच औषधी वनस्पतींच्या संवर्धनासाठी उत्तम साठवणूक व्यवस्था निर्माण करण्यात येत आहे. केंद्र शासन महाराष्ट्र शासनासोबत या क्षेत्राच्या विकासासाठी काम करेल. शेतकऱ्यांसाठी औषधी वनस्पतींच्या लागवडीतून रोजगार उपलब्ध होणार आहे.त्यामुळे या योजनेवर गांभीर्याने काम करून शेतकऱ्यांना नवीन रोजगाराचे दालन उपलब्ध करून द्यावे, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

# जिंती येथे श्री ज्योतिर्लिंग देवाच्या यात्रेनिमित्त ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन तर्फे विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

जिंती ता.कराड येथे श्री ज्योतिर्लिंग देवाच्या यात्रेनिमित्त ज्ञानप्रबोधिनी फौंडेशन जिंती व जिंती ग्रामस्थ यांच्या विद्यमानाने व्यक्तिमत्व विकासात संमोहनाची किमया कार्यक्रम व गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा घेण्यात आला होता. यामध्ये कार्यक्रमाची सुरुवात ठीक ९.३० वाजता झाली त्यावेळी अर्जून जाधव यांनी गणपतीचे सुंदर असे मंचावर चित्र काढून एक चित्रकलेचे प्रदर्शन केले. गावातील विशेष पालकांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. त्याचबरोबर फौंडेशनचे सदस्य उपस्थित होते. जि. प.शाळा जिंतीच्या चिमुकल्यानी कार्यक्रमाची सुरुवात श्री गणेशाच्या वंदनाचे गीत आणि नृत्य सादरीकरणाने झाली. त्यानंतर श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंतीच्या मुलींनी महात्मा फुले जयंतीचे औचित्य साधून सावित्रीचा शिक्षणाचा लढा ही पथनाट्य सादर केले. जि. प.शाळा जिंती,श्री ज्योतिर्लिंग विद्यालय जिंती मधील विशेष प्राविण्य मिळवलेले विद्यार्थ्यांचा सत्कार केला तसेच मागील वर्षी श्रीकांत कारंडे सर यांनी NMMS विद्यार्थ्यांना बक्षीस जाहीर केली होते.त्याप्रमाणे माजी मुख्याध्यापक श्री श्रीकांत कारंडे यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येकी




एक हजार रुपये शिष्यवृत्ती देऊन व ज्ञान प्रबोधनी फाउंडेशन जिंती व तिने स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. शिरोली कोल्हापुर येथील संमोहनतज्ञ श्री शशांक प्रिस्टे सर यांनी मानवी जीवनातील मनाच्या सामर्थ्याचे महत्त्व व व्यक्तिमत्व विकासासाठी सकारात्मक विचारांची गरज यावरती विचार व्यक्त करून कार्यक्रमाची शानदार सुरवात केली करून.प्रथम एकमेकास हात जोडून मनाची एकाग्रता करण्यास सांगून उपस्थित प्रेक्षकांमधीलच काही प्रेक्षकांना समूहगीत केले केले.बहुतांश स्वइच्छेने प्रेक्षकांनी सहभाग घेतला त्यावर संमोहनतज्ञ श्री शशांक प्रिस्टे सरांनी प्रेक्षकांच्या मनावर ताबा घेऊन भूतकाळात जाऊन प्रश्न विचारायला सुरवात केली. कॉलेजमध्ये जीवन कसे होते हे विचारले विचारले तर संमोहित झालेल्या प्रेक्षकांनी आपल्या किशोरवयातील शालेय जीवनातील काही बाबी सांगितल्या. समूहहितांमध्ये उच्चपदस्थ अधिकारी तरुणही सहभागी झाले होते. त्यांना भूतकाळात नेऊन १० वीच्या मित्राची माहिती विचारली असता, सर्व नावे सांगितली. गणिताची सूत्र सांगितले त्यानंतर अगदी १लीच्या आठवणी काढल्या *नाच रे मीरा आंब्याच्या वनात नाच* या गाण्यावर सर्व संमोहित झालेल्या प्रेक्षकांना नृत्य करायच सांगितले त्यांनी ते अगदी लहान बाळाप्रमाणे नृत्य करू लागल्याने प्रेक्षकांना आश्चर्याचा धक्का बसला. आणि पोट धरून खदाखदा हसायला लावेल असा क्षण सर्व प्रेक्षकांनी अनुभवला. केला . आपण लहान बाळ आहात आपणास रडू येते आहे मग आपण कसे रडाल असे सांगितल्यावर अक्षरशा लहान बाळाप्रमाणे तरुण मुले रडत होते ही किमया संमोहनाने घडते हे सर्वांना पहावयास मिळाले. आपण मागच्या जन्मी कोण होतो ही माहिती सुध्दा माहिती सांगितली. नंतर पूर्ववत होत जीवनावरच्या सर्व आयुष्याच्या स्थरातून जाऊन पूर्ववत केले. संमोहित झालेल्या सर्व लोकांचा आत्मविश्वास वाढून त्यांचा सकारात्मक विकास दृष्टिकोन वाढेल यासाठी समोरची शक्ती काम करत असल्याचे संमोहनतज्ञ श्री शशांक प्रिष्टे सर यांनी सांगितले. संमोहनाचा मनोरंजन आणि व्यक्तिमत्व विकासासाठी मनाच्या एकाग्रतेसाठी व सकारात्मक विचारासाठी उपयोग कसा करावा यासाठी सादर केलेला कार्यक्रम जिंती आणि जिंती च्या परिसरातील सर्व प्रेक्षकांच्या स्मरणात निश्चितच राहील असे मत ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंतीच्या सर्व कार्यकर्त्यांनी व्यक्त केले .
ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन जिंती व सर्व ग्रामस्थांच्या वतीने संमोहन तज्ञ श्री शशांक प्रिष्टे सर यांचा सत्कार फाउंडेशनचे अध्यक्ष डॉक्टर दादासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आला व उपस्थितांचे आभार मानले.

# नवगाव येथे मोफत उर्दू शाळेचे( मकतब) ची सुरवात

**दैनिक युवक आधार.**
**पैठण प्रतिनिधी गौतम सोनवणे.**




पैठण तालुक्यातील मौजे नवगाव येथे मरहुंम हाजी रशीद पठाण उर्दू शाळेचे मकतब चे उद्घाटन बारामती ऍग्रो कन्नड चे शेतकी अधिकारी तथा केन मॅनेजर श्री आसिफ पठाण साहेब यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.
गावात लहान मुला मुलींना व वयस्कर लोकांना मोफत उर्दू, कुराण, अरबी चे शिक्षण मिळावे या साठी ह्या उर्दू शाळेची सुरवात करण्यात आली आहे या शाळेतील गोर गरीब मुले मुलींना शिक्षना सोबत पुस्तके, गणवेश मोफत देण्यात येणारं आहे पैठण चे प्रसिद्ध मुफ्ती साहेब श्री मौलाना मुफ्ती रज्जाक साहेब, गुजरात चे मौलाना कारी इनायतुल्ला यांच्या देखरेखे खाली व मार्गदर्शनखाली सुरवात करण्यात आल्याची महिती या शाळेचे मुख्याध्यापक श्री मौलाना हाफीज नईम यांनी दिली या प्रसंगी बारामती ऍग्रो कन्नड चे शेतकी अधिकारी श्री आसिफ पठाण साहेब, या शाळेचे अध्यक्ष तथा गोदावरी पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज वाळूज चे अध्यक्ष श्री वाहेद पठाण सर,या मकतब चे संचालक श्री गुलदाद पठाण, विहामंडवा चे माजी सरपंच श्री राजू भाई शेख, मौलाना आमजद सिराजी,मौलाना रईस मिल्ली, मौलाना अन्सार, आहेमद पठाण मकसुद पठाण, रफीक पठाण, डॉ अर्शद पठाण, सिराज पठाण, कानडे साहेब, दत्ता मुळे, फिरोज पठाण , तोफिक पठाण, वसीम पठाण , आसीफ कुरैशी यांच्या सुभ हस्ते फीत कापून सुरवात करून मार्गदर्शन केले लोहगाव उर्दू शाळेचे मौलाना हबीब साहेब, तुळजापूर येथील उर्दू शाळेचे मुख्याध्यापक श्री मौलाना अबू तलाहा यांच्या हस्ते दुवा करण्यात आली आज पहिल्याच दिवशी या शाळेत तिस मुला मुलींनी प्रवेश घेतला

## निवडक

### उद्या शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्रदान समारंभ

**मुंबई :** क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या ज्येष्ठ क्रीडा महर्षी यांना शिवछत्रपती राज्य क्रीडा जीवन गौरव, उत्कृष्ट क्रीडा मार्गदर्शक, जिजामाता पुरस्कार (महिला क्रीडा मार्गदर्शकांसाठी) व शिवछत्रपती राज्य पुरस्कार- खेळाडू, दिव्यांग खेळाडू व साहसी पुरस्कार प्रदान करण्यात येतात. सन २०२२-२३ व २०२३ -२४ या वर्षासाठीचे पुरस्कार राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, पुणे येथे शुक्रवार, १८ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे.

### 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात कोळेकर यांची मुलाखत

**मुंबई :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय निर्मित 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात 'नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प-२ ची अंमलबजावणी' या विषयावर नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे कृषी विद्यावेत्ता आणि मृदा विज्ञान तज्ज्ञ विजय कोळेकर यांची मुलाखत प्रसारित होणार आहे. 'जय महाराष्ट्र' कार्यक्रमात ही मुलाखत मंगळवार, २२ एप्रिल २०२५ रोजी रात्री ८.०० वाजता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर प्रसारित होणार आहे. तसेच महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवर खाली दिलेल्या लिंकवरून ही मुलाखत पाहता येणार आहे. निवेदिका सुचेता गरूडे यांनी ही मुलाखत घेतली आहे.

### अदाणी इलेक्ट्रिसिटीच्या कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा

**मुंबई :** अदाणी इलेक्ट्रिसिटीतर्फे आपल्या वीज वितरण कार्यक्षेत्रात १४ ते २० एप्रिल दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताह साजरा केला जात आहे. या आठवड्यात अदाणी इलेक्ट्रिसिटी च्या कर्मचाऱ्यांसाठी व अधिकाऱ्यांसाठी अनेक अग्नी विरोधी सुरक्षा कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. आगीपासून सुरक्षित भारत प्रज्वलित करण्यासाठी एकत्र होऊया, ही यावर्षीच्या सप्ताहाची संकल्पना आहे. मुंबईतील व्हिक्टोरिया गोदीत १४ एप्रिल १९४४ रोजी झालेल्या भीषण स्फोट आणि अग्नि तांडवात मृत्युमुखी पडलेल्या वीरांच्या स्मरणार्थ तसेच सर्व उद्योगांमध्ये अग्निशामन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी हा सप्ताह आयोजित केला जातो.


### मध्य रेल्वेचे प्लॅटफॉर्म तिकीट विक्रीवर निर्बंध

**मुंबई :** उन्हाळी सुट्टीच्या गर्दीच्या काळात प्रवाशांची संख्या नियंत्रित ठेवण्यासाठी आणि सुरळीत वाहतुकीसाठी मध्य रेल्वेने मुंबई आणि पुणे विभागातील प्रमुख रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरता बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे. ही बंदी १८ एप्रिल २०२५ पासून १५ मे २०२५ पर्यंत लागू राहील. या कालावधीत मुंबई विभागातील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (CSMT), कल्याण आणि लोकमान्य टिळक टर्मिनस (LTT) तसेच पुणे विभागातील पुणे स्थानक येथे प्लॅटफॉर्म तिकिटे विक्रीस उपलब्ध राहणार नाहीत. सुट्टीच्या काळातील वाढलेल्या गर्दीमुळे हा निर्णय घेण्यात आला.

# भुयारी बोगद्याचे ब्रेक थ्रू यशस्वी

## ■ मुख्यमंत्री फडणवीस यांची उपस्थिती ■ मेट्रो मार्ग ७ अ चे ५९ टक्के काम पूर्ण

**मुंबई : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ (टी २) ते अंधेरी पूर्व या मेट्रो मार्ग ७ अ मधील १.६५ किलोमीटर लांबीच्या भुयारी बोगद्याचे ' ब्रेक थ्रू ' आज यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले. या मेट्रो मार्गामुळे मुंबई महानगर क्षेत्रातील मीरा-भाईंदर व पुढे वसई - विरार हा भाग छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळासोबत मेट्रोने जोडले जातील. तसेच ठाणे व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सुद्धा मेट्रो ने जोडण्यात येईल. या मेट्रो मार्गाचे ५९ टक्के काम पूर्ण झाले आहे.**





१ सप्टेंबर २०२३ रोजी डाउनलाईन बोगद्याचे पहिले ड्राईव्ह सुरू झाले. या बोगद्याची लांबी १.६५ किलोमीटर असून लाइनिंगसाठी ११८० रिंग्स बसविण्यात आल्या आहेत. बोगद्याचा व्यास ६.३५ मीटर एवढा असून सहा भागात विशेष डिझाईन असलेल्या प्रिकास्ट रिंग वापरण्यात आल्या आहेत.

आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिकाऱ्यांकडून प्रकल्पाविषयी माहिती जाणून घेतली. तसेच कळ दाबून 'ब्रेक थ्रू' कामाला सुरुवात केली. हा भुयारी बोगदा मेट्रो ७ अ वर डाऊनलाईन वर आहे. छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ स्टेशन ते एअरपोर्ट कॉलनी स्टेशन दरम्यान हा बोगदा असणार आहे.

सप्टेंबर २०२३ मध्ये टीबीएम मशीन जमिनीपासून ३० मीटर खाली भूगर्भात उतरवण्यात आली. मेट्रो मार्ग तीनच्या वरून, सहार उन्नत रस्त्यांच्या पायाखालून, मोठ्या सांडपाणी वाहिन्या व जलवाहिन्यांना क्रॉस करून विविध अडचणींवर मात करून या बोगद्याचा ब्रेक थ्रू पूर्ण करण्यात आला. या मेट्रो मार्गामुळे मुंबईकरांना कुलाबा ते वसई विरार, मीरा भाईंदर पर्यंत आरामदायी प्रवास अनुभवता येणार आहे.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, कौशल,रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाचे मंत्री मंगल प्रभात लोढा, आमदार पराग अळवणी, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त संजय मुखर्जी, अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुदगल आदी उपस्थित होते.

### मेट्रो मार्ग ७ अ विषयी ...

मेट्रो मार्ग ७ अ मार्गाची लांबी ३.४ किलोमीटर असून त्यापैकी उन्नत मार्ग ०.९४ किलोमीटर आणि भूमिगत २.५० किलोमीटर आहे. या मार्गावर दोन स्थानके असणार आहेत. एक स्थानक उन्नत मार्गावर एअरपोर्ट कॉलनी तर दुसरे स्थानक भूमिगत छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे असणार आहे. उन्नत मेट्रो मार्ग ०.५७ किलोमीटर असेल दुहेरी बोगद्याची लांबी २.०३५ किलोमीटर आहे.

# सेवानिवृत्त अग्निशामक जवान अधिदानाच्या प्रतिक्षेत

## निवृत्त देणी न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा

**मुंबई** - मुंबई महापालिकेच्या अग्निशमन विभागातील ३० ते ३५ सेवानिवृत्त जवान, यंत्र चालक यांचे मागील ६ महिने ते दीड वर्षापासून पालिकेने अधिदान केलेले नाही. त्यामुळे सर्व निवृत्त जवानांची हक्काची निवृत्त देणी १ में २०२५ च्या अगोदर देण्याची मागणी केली आहे. निवृत्ती श्रेणी न मिळाल्यास १ मे महाराष्ट्र दिनी भायखळा मुख्यालयासमोरील रणस्तंभाजवळ आंदोलन करणार असल्याचेही माहिती राजाराम धुरी या निवृत्त कर्मचाऱ्यांनी दिली.

मुंबई महानगरपालिकेचे अग्निशमन विभागातील जवान, यंत्र चालक सेवेतून निवृत्त झाले आहेत. पण त्याचे सेवावृत्तीनंतर मिळणारे अधिदान अद्याप मिळाले नाही. यांना केवळ ११ हजार रुपये पेन्शन स्वरूपात दिले जात आहे. त्यामुळे या सेवानिवृत्त जवानांवर जगायचे कसे? असा प्रश्न निर्माण झाला आहे. या कर्मचाऱ्यांनी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालिका आयुक्त भूषण गगराणी, पोलिस आयुक्त, मुंबई अग्निशमन दल लढाऊ कामगार सेना आदींना निवेदन देऊन आपली कैफियत त्यांच्यासमोर मांडली आहे.

### निवृत्ती दावे निकाली काढण्यास विलंब

सेवानिवृत्त जवानांनी सांगितले की, वारंवार दाव्यामध्ये जाणून बुजून चुका करुन निवृत्ती दावे निकाली काढण्यास उशिर करत आहेत. शासकीय नियमानुसार निवृत्त झालेल्या दिवशी कर्मचाऱ्यांची सर्व देणी मिळणे क्रमप्राप्त असून सुद्धा कार्यालयीन विभागाकडून या नियमाला धाब्यावर बसवण्यात आले आहे. कार्यालयीन कर्मचाऱ्यांवर प्रमुख अग्निशमन अधिकारी याचे नियंत्रण नाही असे दिसून येत असल्याचे सेवानिवृत्त जवानांनी निवेदनात म्हटले आहे.

# डॉ. आंबेडकरांचे विचार तरुणांपर्यंत पोहोचविणे महत्त्वाचे



## राज्यमंत्री माधुरी मिसाळ

## इंदू मिल आंबेडकर स्मारकाची केली पाहणी

**मुंबई :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यकर्तृत्वाने तरुणांमध्ये एक वेगळी ऊर्जा निर्माण होते. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक कार्य पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा, असे निर्देश राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिले.

सामाजिक न्याय, नगरविकास, परिवहन, वैद्यकीय शिक्षण, अल्पसंख्याक व औकाफ राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी नुकतीच इंदू मिल येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची प्रत्यक्ष पाहणी केली आणि कामकाजाचा आढावा घेतला. चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतीस्थळाला भेट देऊन त्यांना वंदन केले.

यावेळी आमदार भाई गिरकर, सहसचिव सोमनाथ बागुल, सह आयुक्त प्रसाद खैरनार, कार्यकारी अभियंता प्रदीप अहिरे, नगरसेविका समिता कांबळे, माजी नगरसेवक शरद कांबळे, राहुल कांबळे, अशोक कांबळे उपस्थित होते.

डॉ. आंबेडकर यांचा शैक्षणिक आणि सामाजिक इतिहास प्रभावीपणे मांडण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञान, ऑडिओ-विज्युअल माध्यमे, इंटरेक्टिव्ह डिस्प्ले, लेझर शो इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा. आंतरराष्ट्रीय पर्यटकांपर्यंत आपला इतिहास कसा पोहोचवता येईल यासाठी नियोजन करावे, असे निर्देश राज्यमंत्री मिसाळ यांनी दिले.

# दालनावरून पालिका अधिकाऱ्यांमध्ये जुंपली

**मुंबई :** महानगरपालिका मुख्यालयातील विस्तार इमारतीच्या सहाव्या मजल्यावरील कार्यालय व दालन नूतनीकरणानंतर उपायुक्त (पायाभूत सुविधा) यांना देण्यात आले होते. माजी अधिकारी उल्हास महाले यांनीही त्याच दालनातून सर्व कामकाज पार पडले. महाले यांच्या निवृत्तीनंतर शशांक भोरे यांची उपायुक्त (पायाभूत सुविधा) पदी नियुक्ती झाली. मात्र, काहीच आठवड्यात त्यांना अन्य दालनात बसण्यास सांगण्यात आले, असा आरोप म्युनिसिपल इंजिनीअर्स असोसिएशनने केला आहे. या घटनेबाबत चर्चा करण्यासाठी महानगरपालिका आयुक्त तसेच प्रशासक भूषण गगराणी यांना इंजिनीअर्स असोशिएशनने पत्र पाठवले आहे.



मागील काही महिन्यांपूर्वी महानगरपालिकेने उल्हास महाले यांच्या निवृत्तीनंतरही पुन्हा त्याच पदावर म्हणजेच उपायुक्त (पायाभूत सुविधा) या पदावर त्यांना कंत्राटी तत्वावर सामावून घेतले. या कंत्राटी उपायुक्त पदाची नियुक्ती केवळ एका वर्षासाठी होती. त्याचा कालावधी १४ मार्च २०२५ रोजी संपुष्टात आला. त्यामुळे १३ मार्च २०२५ रोजी उल्हास महाले यांनी पदभार सोडल्यानंतर शशांक भोरे यांच्याकडे उपायुक्त पदाचा कार्यभार सोपविण्यात आला. महानगरपालिका मुख्यालयातील सहाव्या मजल्यावरील दालनातून महाले यांनी संपूर्ण कारभार सांभाळला. मात्र, शशांक भोरे यांना हे दालन मिळू नये, यासाठी त्यांच्या मर्जीतले काही कर्मचारी प्रयत्न करत होते. असा आरोप असोसिएशनने केला आहे.

अखेर शुक्रवारी त्यांना अन्य दालनात बसण्यास भाग पडण्यात आले, असा दावा म्युनिसिपल इंजिनीअर्स असोसिएशनचे कार्याध्यक्ष रमेश भुतेकर यांनी केला आहे. परिणामी, अभियंता संवर्गात या प्रकारामुळे प्रचंड नाराजी पसरली आहे.

# दुचाकी घसरल्याने तरुणाचा मृत्यू

**मुंबई :** एल्फिन्स्टन ब्रिजजवळ बुधवारी सकाळी दुचाकी घसरून झालेल्या अपघातात जिगर दिलीप गाला (वय ३९) याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या प्रकरणी दादर पोलिस ठाण्यात अपघाती मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रभादेवी येथील भीकू बिल्डिंग, येथे राहणारे जिगर गाला हे आपल्या चुलत भावासोबत दुचाकीवर प्रवास करत होते. सकाळी ६.१५ वाजता एल्फिन्स्टन ब्रिजजवळ त्यांची दुचाकी घसरली.

# निमशासकीय कार्यालयांचे मूल्यमापन होणार

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय कार्यालयातील १०० दिवसांच्या कामाचा आढावा घेण्यास सुरुवात केली आहे. १०० दिवसांच्या कामाचा टप्पा योग्यरीत्या पार पाडला की नाही याचा लेखाजोखा मांडण्यात येणार आहे. यासाठी प्रत्येक शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे मुल्यमापन करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. दोन टप्प्यात मुल्यमापन झाल्यानंतर उत्तम कामगिरी करणाऱ्या विभाग व कार्यालय प्रमुखांचा प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात येणार आहे.

# रस्ते कामात बाधित होणाऱ्या झाडांसाठी नव्याने संरेखण

## अतिरिक्त आयुक्त बांगर यांचे निर्देश

**मुंबई :** मुंबई महापालिका क्षेत्रात रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. यादरम्यान रस्ते काँक्रिटीकरण करताना ड्राय लीन काँक्रिटचा थर टाकला जातो. त्याची योग्यता तपासण्यासाठी सर्व ठिकाणी 'फिल्ड ड्राय डेन्सिटी' चाचणी अनिवार्य आहे. तसेच बोरिवली पश्चिम येथील श्री. अय्यप्पा मंदिर मार्गाच्या काँक्रिट कामात झाडे बाधित होत असल्याचे आढळल्याने रस्त्याचे संरेखन सुधारित करून झाडे वाचवण्याचे निर्देश महापालिका अतिरिक्त आयुक्त अभिजित बांगर यांनी दिले.



### एकाच दिवशी १०१ रस्त्यांचे काँक्रिटीकरण


पश्चिम उपनगरांत एकाच दिवशी १०१ रस्त्यांच्या कामात मिळून तब्बल ३ हजार ११६ घनमीटर काँक्रिट टाकण्यात आले. त्या१चा आढावा घेत बांगर म्ह णाले की, रस्ते कामांची गती वाढली आहे, हे यातून सिद्ध होते आहे. कामांची गती वाढवताना कामांच्या गुणवत्तेशी वेगाचा योग्य ताळमेळ साधावा. जे रस्ते हाती घेतलेले नाहीत, त्या रस्त्यांवर खड्डे उद्भवणार नाहीत, याची दक्षता बाळगावी. अतिरिक्त मनुष्यबळाचा वापर करून उर्वरित कामे जलद गतीने मार्गी लावण्याचे आदेश बांगर यांनी दिले.

**'फिल्ड ड्राय डेन्सिटी' चाचणी अनिवार्य**

रस्ते खड्डेमुक्त करण्याच्या उद्देशाने संपूर्ण बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रात रस्त्यांची सिमेंट काँक्रिटीकरण कामे वेगाने सुरू आहेत. या अंतर्गत पश्चिम उपनगरातील रस्ते काँक्रिटीकरण कामांची अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यामध्ये, सांताक्रूझ पूर्व येथील श्री अग्रसेन महाराज चौक, जोगेश्वरी पूर्व येथील हनुमान नगर, नटवर नगर, गोरेगाव पश्चिम येथील पवनबाग मार्ग आणि बोरिवली पश्चिम येथील श्री. अय्यप्पा मंदिर मार्ग येथील कामांचा समावेश होता.

सांताक्रूझ पूर्व येथील श्री अग्रसेन महाराज चौक आणि गोरेगाव पश्चिम येथील पवनबाग मार्ग येथे पेव्हमेंट क्वा लिटी काँक्रिट (PQC) कामापूर्वी ड्राय लीन काँक्रिट टाकण्याबचे काम सुरू होते. त्या नंतर बांगर यांनी जोगेश्वरी पूर्व येथील हनुमान नगर येथे सध्या सुरू असलेल्याट रस्तेय कामाची आणि त्यालगत पहिल्याा टप्या पूरत नटवर नगर येथे करण्युात आलेल्याय रस्ते काँक्रिटीकरण कामाची पाहणी केली.

# जलसंपदा विभागातील रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करा



## उच्च न्यायालयाचे सरकारला आदेश

**मुंबई :** जलसंपदा विभागातील वरिष्ठ पातळीवरील महत्त्वाची पदे रिक्त असून त्याचा राज्यभरातील शेतकऱ्यांना फटका बसत आहे. कृषी विभागाशी संबंधित कामे मार्गी लागण्यात अडचणी येत आहेत. याची गंभीर दखल घेत उच्च न्यायालयाने जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरण्यासाठी कार्यवाही करण्याचे आदेश सरकारला दिले आहेत. हे आदेश देत न्यायालयाने रिक्त पदांकडे लक्ष वेधणारी जनहित याचिका निकाली काढली.

सोलापूरच्या करमाळा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवलेले अतुल खुपसे यांनी यासंदर्भात जनहित याचिका दाखल केली होती. त्यांच्यावतीने अड. राकेश भाटकर आणि अड. मोहन देवकुळे यांनी ही जनहित याचिका न्यायालयाच्या निदर्शनास आणली. त्यावर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली.

जलसंपदा विभागातील प्रमुख रिक्त पदे भरण्याच्या मागणीबाबत याचिकाकर्त्याला राज्य सरकारच्या प्रधान सचिवांना नवीन सविस्तर निवेदन सादर करण्यास मुभा द्या, तसेच प्राधिकरणाला त्या निवेदनावर विचार करण्याचे निर्देश देण्याची विनंती अड. भाटकर यांनी केली. त्यावर याचिकाकर्त्याने निवेदन सादर केले तर निवेदनाच्या गुणवत्तेनुसार ते जलदगतीने हाताळले जाईल, असा युक्तिवाद सरकारतर्फे अतिरिक्त सरकारी वकील के. बी. दिघे यांनी केला.

दोन्ही बाजू ऐकून घेतल्यानंतर खंडपीठाने राज्य सरकारला याचिकाकर्त्याच्या निवेदनाचा गांभीर्याने विचार करून जलसंपदा विभागांतर्गत वरिष्ठ पातळीवरील प्रमुख रिक्त पदे तातडीने भरण्याचे निर्देश दिले. त्यानंतर खंडपीठाने जनहित याचिका निकाली काढली.

### शेतकऱ्यांना समस्यांचा सामना करावा लागतोय!

जलसंपदा विभागांतर्गत अतिरिक्त मुख्य सचिव, कार्यकारी संचालक, मुख्य कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता तसेच कार्यकारी अभियंता ही प्रमुख पदे कित्येक महिन्यांपासून रिक्त आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठ्या समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जे अधिकारी कार्यरत आहेत, त्यांना एकापेक्षा अधिक पदांवर काम करावे लागत आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांच्या समस्या सोडवल्या जात नाहीत, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला.

## सोयी सुविधा, कनेक्टिव्हिटी, पारदर्शक व्यवहार आणि परवडणारा दर

# सिडको गृहसंकुलातील घरे सर्वसामान्यांसाठी आश्वासक

**मुंबई :** सिडकोच्या तळोजा, खारकोपर, बामणडोंगरी आणि द्रोणागिरी या वसाहती आज नवी मुंबईच्या झपाट्याने विकसित होणाऱ्या शहरी परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरत आहेत. ज्या भागांकडे भविष्यातील शक्यता म्हणून पाहिले जात होते, ते आता सशक्त पायाभूत सुविधा, मूलभूत सेवा आणि सुलभ कनेक्टिव्हिटी यामुळे एक सजीव वास्तव बनले आहेत. येथे होणारी एकत्रित निवासी व व्यावसायिक वाढ ही शहराच्या गतिमान परिवर्तनाचा महत्त्वाचा भाग बनली आहे.



या परिवर्तनामागे सिडकोने दूरदृष्टीने आखलेले व सुनियोजित पद्धतीने अंमलबजावणी केलेले पायाभूत सुविधांचे प्रकल्प हे मुख्य कारण ठरत आहेत. तळोजा आणि खारकोपरमध्ये मेट्रो स्थानकं आणि ट्रान्सपोर्ट हब्स उभारण्यात येत आहेत, ज्यामुळे रहिवाशांना संपूर्ण नवी मुंबईत आणि त्यापलीकडेही जलद व सुलभ प्रवास शक्य होईल.

या मेट्रो प्रकल्पांमुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होईल आणि ही क्षेत्रे प्रमुख व्यावसायिक व औद्योगिक केंद्रांशी जोडली जातील ज्यामुळे हा परिसर गृहखरेदीदार व गुंतवणूकदारांसाठी आकर्षक बनला आहे.

**सर्वसमावेशक जीवनशैलीचा विचार**

सिडकोने फक्त घर नाही, तर संपूर्ण सर्वसमावेशक व सुनियोजित शहर तयार करण्यावर भर दिला आहे. बामणडोंगरी आणि द्रोणागिरीमध्ये उद्याने, आरोग्य सुविधा, शाळा यांसारख्या सामाजिक सुविधांचा समावेश करण्यात आला आहे. हा समावेश सिडकोच्या समग्र शहरी नियोजन पद्धतीचा भाग आहे — जिथे रोजगार, सामाजिक जीवन आणि विरंगुळा यांचं संतुलन साधलं जातं.

या परिसरात निर्माण होणाऱ्या सुविधा केवळ घराजवळ उपलब्ध नसून, त्या रहिवाशांच्या आरोग्य, शिक्षण आणि मनोरंजनाच्या गरजा पूर्ण करतात. त्यामुळे ही घरं राहण्यासाठी सर्वोत्तम पर्याय बनतात.

**विकासाच्या केंद्रस्थानी असलेली घरे**

सिडकोच्या गृहनिर्माण योजना या गतिमान शहरविकासाच्या अगदी मध्यभागी आहेत. मेट्रो स्थानके, हॉस्पिटल्स, शाळा, उद्याने यांसारख्या सामाजिक सुविधा नजीकच्या परिसरात विकसित होत असल्यामुळे, एकत्रित जीवनशैलीचा अनुभव देतात.

सिडकोच्या या ठिकाणी असलेल्या गृहनिर्माण प्रकल्पांमधून फक्त घरच नाही तर एक संपूर्ण, शाश्वत आणि आधुनिक जीवनशैली देण्याचा प्रयत्न आहे. हे प्रकल्प एकात्मिक समुदाय घडवत आहेत, जिथे रहिवाशांना त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक गरजा पूर्ण करता येतात.

### सतत बदलत असलेले शहर

तळोजा, खारकोपर, बामणडोंगरी आणि द्रोणागिरी या भागांचा विकास हे नवी मुंबईच्या प्रगतीच्या दिशेतील महत्त्वपूर्ण वळण आहे. तळोजा, खारकोपर, बामणडोंगरी आणि द्रोणागिरी हे भाग आता 'अपकमिंग' राहिले नाहीत + ते नवी मुंबईच्या बदलत्या योजनेचे केंद्र ठरत आहेत. सशक्त पायाभूत सुविधा आणि विविध सोयी-सुविधांनी परिपूर्ण, सिडकोचे हे गृहनिर्माण प्रकल्प आधुनिक शहराच्या यशस्वी विकासात सहभाग घेण्याची संधी प्रदान करतात.